इ. वि. का. राजवाडे
संशोधन मंडळ, धुळे.

मार्च १९८३, वर्ष ५१,
अंक पहिला

संपादक

श्री. श्री. भा. भट

श्री. द. रा. भट

डॉ. प्र. न. देशपांडे

डॉ. मु. ब. शहा

मूल्य ५ रुपये

संशोधक

वार्षिक वर्गणी १५ रु.

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ,
धुळे - ४२४ ००१

※

– लवकरच प्रकाशित होत आहेत –

१) १०९ कलमी बखर – डॉ. प्र. न. देशपांडे
(प्रस्तावना व टिपासह)

२) अप्रकाशित वेडिया नागेश – डॉ. मु. ब. शहा
(काव्य व प्रस्तावनेसह)

साहित्य व इतिहासातील संशोधनाला वाहिलेले
दर्जेदार त्रैमासिक

‘संशोधक’

वार्षिक वर्गणी रु. १५।–

संपादक

श्री. भा. भट

द. रा. भट

डॉ. प्र. न. देशपांडे

डॉ. मु. ब. शहा

‘संशोधक’ त्रैमासिकाच्या वर्गणीदारांना सूचना

‘संशोधक’ त्रैमासिकाचा १९८२ या वर्षाची वर्गणी सुवर्णमहोत्सवी अंकाबरोबरच संपते. सुवर्णमहोत्सवी अंक मार्च, जून, सप्टेंबर, आणि डिसेंबर १९८२ या चार अंकांचा समावेश असलेला संयुक्तांक आहे.

ज्यांची वर्गणी मार्च ते डिसेंबर १९८२ पर्यन्त आमच्याकडे आली असेल त्यांना या वर्गणीत सुवर्णमहोत्सवी अंक पाठवला आहे त्यामुळे ~~मार्च~~ १९८३ ची ‘संशोधका’ ची वर्गणी कृपया त्वरीत पाठवावी.

मार्च १९८३ चा पहिला अंक आपली वर्गणी संपली असली तरी ती येईल या अपेक्षेनेच पाठवित आहोत. कळावे. ही विनंती

संपादक
‘संशोधक’ त्रैमासिक
इ. राजवाडे संशोधन मंडळ
धुळे-४२४००१.

॥ श्री विश्वनाथो विजयते ॥

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान देऊन
पुरस्कृत केलेले

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.
त्रैमासिक

संशोधक

वर्ष ५१) मार्च १९८३ (अंक १ ला

मूल्य ५ रु.

प्रकाशक : श्री. श्री. भा. भट, चिटणीस, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
मुद्रक : श्री. तापीराम चौधरी, मित्र प्रि. प्रेस, नगरपट्टी, धुळे.

अनुक्रम

संपादकीय

'संशोधक' चा सुवर्णमहोत्सवी अंकापाठोपाठचा जाने.–फेब्रु.–मार्च १९८३ चा हा अंक अभ्यासू सदस्यांकरता उपलब्ध होत आहे.

'An Estimate of Shahaji's Place in the History' हा श्री. बी. जी. तामसकर यांचा लेख मराठी स्वराज्य संस्थापनेच्या प्रयत्नात शहाजींचा केवढा सहभाग होता यावर पुराव्यानिशी प्रकाश टाकतो. दादाजी कोंडदेव व शहाजी हे शिवाजीमहाराजांच्या स्वराज्य प्रस्थापनेच्या प्रयत्नांचे विरोधी होते, असा आरोप त्यांच्यावर घेतला जातो. श्री. तामसकर यांनी या आरोपाचे साधार खंडन केले आहे.

डॉ. भा. रा. अंधारे यांनी प्रथम ऑंग्ल - मराठा युद्धात बाळाजी गोविंद खेरांनी बजावलेल्या असामान्य कामगिरीचा आढावा आपल्या लेखात घेतला आहे. बुंदेलखंडातील या शूर मराठा सुभेदाराला इंग्रजांचे सैन्य बुंदेलखंड पार करून मुंबईपर्यंत जात आहे, तेच मुळात मराठी सत्तेचा नायनाट करण्यासाठी याची कल्पना होती. कर्नल लेस्लीच्या सैन्याला रोखायचे जे प्रयत्न बाळाजी गोविंदने केले ते कौतुकास्पद म्हणावे लागतील.

राजवाडे संशोधन मंडळातील अप्रकाशित मौल्यवान सामग्री क्रमशः प्रकाशित करण्याचे 'संशोधन' चे धोरण आहे. त्यानुसार डॉ. मु. ब. शहा यांनी एकनाथ शिष्य नरहरि यांच्या 'पुष्पांजली' या ५५० ओव्यांच्या ग्रंथांची मूळ संहिता प्रकाशित केली आहे. नरहरिचा असा कुठलाही ग्रंथ असल्याची साहित्यात नोंद नाही. मंडळातर्फे प्रथमतःच हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. यथाकाळ त्यावरची समीक्षाही प्रकाशित होईल.

– संपादक

An Estimate of Shahaji's Place in the History

- B. G. Tamaskar

An Estimate of Shahaji's Work -

The Marathi Bakhar-writers dwelt at length on the abilities and achievements of Shivaji and unwillingly curtailed the description of those of Shahji. It may be that their own knowledge of Shahji's life was rather meagre. Shahji, after his submission to the combined attack of the Adilshah and the Moghul Emperor, passed his life mostly in Karnatak. In Meharashtra, therefore, he has been remembered only as the father of Shivaji. Unfortunately, Shahji had to carry aut the orders of his new master and bring to submission, remove from power cr sometimes destory the Hindu chiefs on Karnatak. These chiefs quarrelled with one another and, thus, provided favourable opportunities to the Adilshah and the Kutbshah for conquest. Shahji had his own share in this work, whether willingly or unwillingly. He could not but be understood to have been anti-Hindu. Bakhar-writers could not but paint him out thus, and, therefore, they have invariably stated that he and his agent, Dadaji Konddeo, were against the idea of Swarajya. It is naturally, that they have attributed to Shivaji all the credit for having originated the idea of Swarajya and carried it out successfully Some statements in this regard are self-contradictory.

It has been mentioned that when after the death of Dadaji Konddeo, Shivaji took all the propeıty into his hands and recruited

men into his army, Shahji wrote him a letter or condolence and sent this in his name (91–Qalmi Bekhar, 1933), If shahji was in reality against Shivaji's idea and work, he could have easily dispossessed him of his Property. Instead of doing this, he sent him grants in his name. It is further revealed that when Shahji had met Shivaji, he expressed his great joy (Ibid). In the same way, on learning the death of his father, Shivaji mourned the loss very much, saying " on learning of these acts of valour, the Maharaj was highly pleased; he used to send me encouraging letters, as also dress and ornaments " (Sabhasad Bakhar, 1933). Another Bakhar has many such statements and of a more definite character (Chitnis Bhakhar, 1921). It has been disclosed that Shahji wrote to Shivaji to take certain territory under his possession by collecting forces and having conquered more, secured by diplomacy the friendship of the Hindu kings: in the mean time Shahji would manipulate matter on his side. After that he was advised to remain there with caution (Ibid).

We need not expect the Bakhar-writers to have been very critical in their statements. They could not be expected to realise that some of their statements went against others. As they believed that the idea of Swarajya was wholly Shivaji's, they went to the length of inventing some stories.

The true greatness of Shahji –

Mohammad Adilshah and his prime minister, Mohammad Mustafakhan were not the sort of persons to pocket insults to Islam and its followers. Shahji seemed to have passed a life of servitude under the Adilshah and put his shoulders and brain to humiliating and destroying the Hindu Chiefs. It was quite natural on the part of uncritical people and superficial observers to say that Shahji was anti– Swarajist, and that the idea of Swarajist and its achievement

were wholly Shivaji's. Every father has to do a lot of sacrifice for for the sake of his sons. The greatest glory of a fether lies in sacrificing his own glory for promoting the glory of his sons. The highest greatness of Shahji lies in this. He never took to himself the credit of having originated the idea of Swarajya, of having set the son on that path and of having seen that difficulties in his way were minimised. As we have seen Shahji did all that and derived satisfaction from the achievements of his son. Whether the letter said to have been addressed by Shivaji to Shahji is a forged one or a genuine one, the sentences reproduced from the letter of the father or at least, ascribed to him, are well indicative of a Hindu father's satisfaction on the achievements of his son :

" You are aware of the critical situation in which I found myself a few years ago in the Bijapur Darbar, on account of Baji Ghorpade of Mudhol having deserted the cause of religion and truth, and having treacherously joined the wicked Turkish party. By the grace of God, I got over the difficulty, kind providence having given the strength to fight for Swaraj and religion. Let me now inform you of fresh development. Khawaskhan has again been dispatched with an army to deal with you. He is supported in this expedition by Baji and Lakham Sawant., who have sworn to over come you. God Shiva and Goddess Amba are always your protectors and will, I am sure, give you victory. You must avenge all the previous wrongs on this occasion : I bless you; my worthy son " (Shivaji Souvenir). Similar feellings are echoed by Bakhar-writer (Chinis Bakhar, 1921). In fact, the son proved to be superior to the father by a quarter. This Hindu saying is meant to express this very sentiment of a parent and Shahji reflected it fully in his character.

Those who have tried to brush Shahji aside either on account of their overzeal to glorify Shivaji or on account of the want of a

liberal and sympathetic heart for the achievements of Shahji and and Shivaji have certainly done injustice to both or, at least to the father. Shahji seems to have been a born soldier and a born general and born with a great ambition. Some scholars think that Shahaji first displayed his general ship and bravory on the battlefield of Bhatwadi (1624 A. D.). But this was the second occassion when he displayed these qualities and won glory First, he seems to have vindicated the loss of his father in the battle of Indapur (Tamaskar, 1978). He carried on a regular campaign against the Adilshahi forces and their usurpation of the territory assigned to Maloji as his Jagir, fought with them a series of battles and won back the lost territory. Since then, he entertained a sort of a personal sentiment for that territory and tried to keep it in his hands even after his failure in his first attempt to build up Swarajya. It was out of and on the foundation of these territories that Shivaji's Swarajya was built up. It is difficult to say with some definiteness, if Shahaji could realize these possibilities on the occasion of his first campaign against the Adilshah. But that he did assess the importance of the territory early in his life can be seen from the fact that on all occasions, first when he went over to the Adilshah after the battle of Bhatwadi in 1624 A. D., then when he returned to the Nizamshah after the death of Ibrahim Adilshah then after the murder of his father-in-law, and, then, after his submission in 1636 A. D. to the combined power of the Adilshah and the Moghul Emperor, he tried to retain that territory in his possession and it was at Pune in the midst of that territory that Shahji kept Shivaji and where the son followed the path, chalked out for him by his father. His second achievement, or, at least, display of generalship and valour, was on the battle field of Bhatwadi. Quite natural the Mohammadan Chroniclers have not mentioned Shahji's name among those who brought victory to Malik Amber here. It is of course the 'Shiv-Bharat' that glorifies the generalship of shahaji, displayed in this battle, and, probably, does it

even to the extent of exaggeration But that Shahji had some hand in the victory can be seen from the fact that Malik Ambar, instead of confirming honours on him, favoured his cousins, at which Shahji felt insulted and went over to the Adilshah. After this defection, there occured fights between Malik Ambar and Shahji, in which the latter tried his best to maintain his position and territories. The very fact that Shahji went over to the Adilshah, kept possession over Pune and other territories manifests that Shahji maintained his position successfully against Malik Ambar. That is no mean achievement. What services Shahji did to Ibrahim Adilshah we cannot say with certainty. He is said to have conquered for him some portion of Kannad territories. After the death of Ibrahim Adılshah, Shahji went back to the Nizamshah. This time he gave fights to Daryakhan, Moghul Sardar and a Lieutenant of Khan Jahan Lodi. But, after the murder of his father-in-law, Lakhoji Jadhao Rao, he could not think it to be safe for him to remain there and, therefore; went to his own territories and ravaged the territories of both the Nizamshah and the Adilshah. For sometime, he acted as an independent chief. Murari Jagdeo came down upon Pune and burnt it to ashes, and Shahji had to seek shelter under the Moghul Emperor. But, the short experience that he had as an independent chief, showed to him that with proper preparations and sympthy of some ruler, it was possible for him to maintain his own against great power. With the fall of Daulatabad in June, 1633, he set up as an independent king under the pretaxt of reviving the defunct Nizamshahi kingdom. This attempt was quite transparent enough to be taken for trying to revive the dead Nizamshahi The Adilshahi Darbar helped him not because it took Shahji at his words, but because it wanted to keep off the Mughul advance as distant as possible and because the government was dominated by Khawaskhan and his agent Murari. After their fall, Shahji's attempt could not but fail. But, the failure had its

own lessons to teach him. He grasped that if a proper and careful attempt was made, the Sahyadri region afforded a good nucleus for the building up of a Swarajya, and that the Hindus were already eager to hail such an attempt. In these three years (1633-1636), he came to know the Sahyadri and its men well. This experience stood him good stead. He also sensed that the Hindus would eagerly gather under a Hindu banner without great difficulty.

His second attempt at Swarajya -

All this experience that he gained during the years; 1633-36 he utilised in a different way. He had launched upon Swarajya-building cautiously and cleverly. First, he shifted himself to Karnatak. Probably, the Adilshah also wanted to keep him engaged in the work of conquest, especially, of the territories of the Hindu chiefs of the Karnatak. He attempted this in the name of his son, Shivaji, who was purposely kept there with his mother. He soon sent there his old colleagues whose intelligence and honesty he had tested and who had stood by him through thick and thin. He entrusted his pian to Dadaji Konddeo, his agent in the Pune territories and his old colleagues. The choice of Konddeo was the most happy one, while, on the one side, he was Shahji's agent for that territory, he was on the other, the Adilshahi Subhedar for the same. So, he could be above suspicion for some years. The Deshmukhas were bound down by sacred oaths, the recalcitrants were destroyed, and, thus, order was restored by Dadaji Konddeo and Shivaji. Everything needed to bring about the economic prosperity of the area was done and, thus, the people's confidence was won over. Then came the taking of the delapidated Rajgarh fort in to possession and its repairs were undertaken cautiously. When questioned Shahji could explain his action by saying that it was necessary for keeping

the quarrelsome Maval Deshmukhs under control. (Chitnis Bakhar) In the meantime, Shivaji was regularly trained for the purpose and introduced to the Deshmukhs as their master, to whom they were bound to give obedience. The oath-taking ceremony in 1644 A. D. in the temple of Rohideshwar (where it was then practioe to take solemn oaths) in the presence of Dadaji Konddeo makes the whole matter quite clear. Shivaji was running the 18th year of hisl life only at thls time. A boy of 17 or 18 years cannot be expected to exert such an influence as to bind down the hereditory and quarrelsome Deshmukhs for an attempt at Swarajya-building. Dadaji Konddeo's presence was a disguise to put forward his young master only as a pretext; in fact, it was his own action done under the instructions of his real and distant master, Shahji. There can be no other explanation for this. This was followed by the taking of Torna, which action was again questioned and which was explained as before. This time it should have been certainly difficult for Shahji to convince the Adilshah that Torna was necessary for keeping control over the Deshmukhs of the Maval area. Probably, he should have pointed out that the fort of Rajgarh was delapidated and was therefore not safe, and that its situation was not favourable for the work. Any how, Shahji, who had fallen in disgrace, was not proceeded against and Torna seems to have been left in the hands of Dadaji Konddeo and Shivaji. This was followed by the death of Dadaji Konddeo.

This statesman must have instructed Shivaji and his assistants that after his death there was likely to be deputed another Subhedar, in which circumstance it was likely that Kondana alias Sinhagarh would no more be available for his work, and that, therefore, it was proper after his death he should take its possession. We believe that Dadaji Konddeo should have given instructions to Shivaji and his assistants as regards the plan for the

purpose. The fort of Purandar was acquired on the same reason. For this Shahji must have sent instructions to Shivaji directly. His policy of confiscation of land grants points out his own hand in the work of Shivaji's taking Purandar and establishing possession over Supa. Shahji, instead of saying a word against Shivaji's actions all this time, seems to have shown approval of and satisfaction at them. Shahji's giving a subgrant of his own Jagir to Shivaji (91-Qalami Bakhar) points out to the same conclusion. Even the More seems to have been given help by Shahji in establishing himself in the Jaoli territory. After this, he shonld have not shown opposition to the Swarajya scheme. It became, therefore, necessary for Shahji and Shivaji to put him out of the way. (Shiva-charitra-Nibandhavali) Shivaji was at this time about twenty-nine years of age, but he should haver eceived instructions from his father, as regards the plan to be used for the purpose. On the occasion of Afzalkhan's expedition Shahji must have certainly apprised his son of its intended evil design. It was, therefore, that Shivaji was fully prepared for every emergency and could succeed in doing away with the worst enemy. This Afzalkhan was responsible for carrying Shahji as a prisoner from Jinji in an insulting and humiliating way, and, also responsible for the death of Sambhaji, the eldest son of Shahji These two great wrongs had to be avenged. Shahji must have communicated him the plan, for he knew Afzalkhan well. The private interview which was arranged was a forethought scheme. We can, therefore, very well suspect Shahji to have evolved it out from his own brain, That Shahji was this time in communication with Shivaji can be well seen from the different statements in the Bakhars, which have been already cited. The letter, printed as addressed by Shivaji to Shahji, shows at least this point to the conviction of all. The Adilshah always suspected him to have been in communication with Shivaji, in spite of all his attempts to

show that he had ceased to have relationship with him. Sabhasad Bakhar clearly mentions that Shahji used to send presents to Shivaji and extol his actions. As Sabhasad was an old officer of Shivaji he should have known the matter at first hand, for Shahji died in 1665 A. D. (Tamaskar, 1971) at an age of about 70 years. That Shahji bestowed a gold umbrella to Goddess Tulja by way of display of his satisfaction on the achievement of Swarajya by Shivaji shows clearly that Shahji's aim was to get Swarajya built up. Shivaji is believed to have said that he did what he was ordered to do. (Chitnis Bakhar)

Evidently Shahaji was a staunch Swarajist, and the first Swarajist of India. The peopls of the twentieth century may have to learn many a lesson from him. This view is voiced by the 'Radha-Madhav-Vilas-Champoo' (Pindye, 1922), which tesifies to the 17th century opinion on the work of Shahji.

Shahji was a great soldier, a great general, a great administrator, a great conqueror, a great patron of the Hindu religion, a great distributor of patronage and gifts. The "Shiv Raj Bhushan, (1907) "Rajayawaharkosh" (Sane, 1926) and the ' Bhonsale Vanshavali ' (Bhat 1926) also appreciate Shahji in the same vein. The 'Shivbharat' is more explicit, when it records.

" God Visnu has been incarnated on the earth in the form of your son, Shiva(ji), with a view to destroy the yavans (Muslims). He will achiave your object; therefore, long-armed (Shahji), wait for some time. '' (Shiva - Bharat, 1929, ch- IX, Verses 17 and 18) The work achieved by Shivaji was the building of an independent Hindu Kingdom in Maharashtra in the face of mighty powers' the Moghul Emperor, the Adilshah, and the

Siddis of Janjira. It follows that in the opinion of the auther of the Shivbharat, Shahji's object in his war during the years 1633–36 was the building up of Swarajya. It can be, therefore, maintained with sufficient historical evidence that Shahji was the first Swarajist of India. The background for stout resistance against the on-rolling tide of the imperialistic designs of the Moghul Empire was well prepared by Malik Ambar, which, ultimately, resulted in the visualisation of organising and planning an independent Hindu Kingdom. (Tamaskar, 1978)

REFERENCE –

1. BHATT, VENKAT ; Bhonsala Vanshavali (in Sanskrit) Edited by DIVEKAR, S. M. in APTE, D. V. and DIVEKAR, S. M. (1926) (Editors) in Shiva-Charitra Pradeep, (Bharat Sanshodhak Mandal, Pune.)

2. BHUSHAN : Shivu-Raj Bhushan in Bhushan Granthavali (In Hindi) 1907. (Banaras)

3. CHITNIS, MALHAR RAMCHANDRA RAO, 1921 Shakakarte Shri Shiva Chhatrapati Maharaj. (Ed. SANE, KASHINATH NARAYAN) (Rao Bahadur Kashinath Sane, Kalyan).

4. KAVI KALASH : Budha Bhushan.

5. PARAMANANDA, KAVINDRA, 1927 : Shri-Shiva-Bharat (in Sanskrit with Marathi Translation) (Edited by DIVEKAR, SADASHIV MAHADEO) Bharat Itihas Samshodhak Mandal, Pune).

6. PINDYA, JAYARAM; 1922 : Radha-Madhav - Vilas-Champoo (Ed., RAJWADE, V. K.) (Chitra-shala Press, Pune).

7. SABHASAD, KRISHNAJI ANANT, 1933 : Life of Shiva Chhatrapati (in Marathi) (Ed., Rao Bahadur, SANE, KASHINATH NARAYAN) (Kashinath Narayan Sane, Kalyan).

8. SANE, KASHINATH NARAYAN : Rajvyavahar-Kosha (Editor) (In Sanskrit), APTE, D.T. and DIVEKAR, S, M., 1920 in Shiva-Charitra Pradeep. (Bharat Samshodhak Mandal, Pune)

9. SARDESAI, G. S. (Editor) : Shivaji Souvenir. (Keshav Bhikaji Dhawale, Girgaon, Bombay.)

10. TAMASKAR, B. G., 1971 : The Date of Shivaji's Death. (Indica, Voi. 8, No. 1, Bombay).

11. TAMASKAR, B. G, 1978 : The Life and Work of Malik Amber. (Jdarah-i-Adabiyat i- I Delli, Delhi).

12. WAKENIVIS, DATTAJI TRIMAL, 1930 : 91 - Qalmi Bakhar of Shiva Chhatrapati. (Ed. WAKASKAR, VINAYAK, SADASHIV).

प्रथम आंग्ल-मराठा युद्धातील —
बाळाजी गोविंद खेरांची असामान्य कामगिरी

प्रा. डॉ. भा. रा. अंधारे

रघुनाथरावाच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेपायी पेशवा नारायणरावाचा खून ३० ऑगस्ट १७७३ रोजी पुणे येथे शनिवारवाड्यात झाला.[१] रघुनाथराव पेशव्याच्या मसनदीवर आसीन झाले. २५ सप्टेंबर १७७३ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर रघुनाथराव निजामावर आक्रमण करण्यास निघाला. रघुनाथरावास पेशवेपदावरून पदच्युत करण्याविषयीचे आज्ञापत्र हरिपंत फडके यांनी साताऱ्याच्या छत्रपति रामराजांकडून आणले.[२] तेव्हा रघुनाथरावास पकडण्याकरिता हरिपंत फडके सैन्यासह निघाले. याच सुमारास १८ एप्रिल १७७४ रोजी पुरंदर येथे सवाई माधवरावाचा जन्म झाला, आणि साक्षात विष्णूने मराठा दौलतीचे रघुनाथरावापासून रक्षणार्थ, अवतार घेतला अशी भावना प्रजेमध्ये निर्माण झाली.[३] २८–५–१७७८ रोजी सवाई माधवरावाकरिता पेशवाईची वस्त्रे आणली गेली.[४] मराठा साम्राज्यातील यादवीचा फायदा घेऊन इंग्रजांनी २८ डिसेंबर १७७४ रोजी साष्टी जिंकले. रघुनाथराव माळवा व गुजराथवरून सुरत येथे २३ फेब्रुवारीला आले. ७ मार्च १७७५ रोजी त्यांनी मुंबईकर इंग्रज सरकारशी तह केला. कर्नल किटिंगच्या नेतृत्वाखाली मुंबईकर इंग्रजांनी राघोबाला पुणे येथे पेशव्याच्या मसनदीवर विराजमान करण्याकरिता सैन्य पाठविले.[५] अशाप्रकारे पहिल्या आँग्ल-मराठा युद्धाला सुरवात झाली. परंतु कलकत्ता येथील सर्वोच्च इंग्रज सरकारला मुंबईकर इंग्रजांनी मराठ्यांच्या अंतर्गत राजकारणात केलेला हस्तक्षेप मुळीच आवडला नाही. मराठ्यांशी सुरू केलेले युद्ध अनधिकृत, अन्यायकारक आणि धोक्याचे असून मुंबईकर इंग्रजांनी सैन्य काढून घ्यावे आणि पुणे येथील बारभाई मंडळाशी बोलणी करावी असा सल्ला दिला.[६]

कर्नल अप्टन आणि बाळाजी गोविंद खेर –

वॉरन हेस्टिंग्ज् याने पुणे दरबाराशी बोलणी करण्याकरिता कर्नल अप्टन याला कलकत्त्याहून बुंदेलखंड मार्गाने २१ जून १७७५ रोजी पाठविले.[७] तसेच सखाराम

बापूस वॉरन हेस्टिंग्ज याने कळविले की कर्नल अपटन बुंदेलखंडातून येत असल्यामुळे त्याची व्यवस्था आणि बंदोबस्त करण्याकरिता बुंदेलखंडाचे मामलतदार बाळाजी गोविंद खेर यांनी परवाना आणि दस्तक कर्नल अप्टन याला द्यावे. तेव्हा १३ ऑक्टोबर १७७५ रोजी बाळाजी गोविंद खेर यांनी वॉरन हेस्टिंग्जला कळविले की 'पुणे दरबारशी तहाची बोलणी करण्याकरिता कर्नल अप्टनला पाठवित आहे. हे वाचून आनंद झाला.' कर्नल अप्टनला बुंदेलखंडाच्या मार्गात कोणत्याही प्रकारचा अडथळा होऊ नये अशी सूचना काल्पी सुभ्यातील मराठा अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत.[८] कर्नल अप्टनला बुंदेलखंडातून पाठविण्यामागे त्याचा हेतु त्या प्रदेशातील संपूर्ण भौगोलिक आणि राजकीय परिस्थितीचे अवलोकन करणे हा होता. बांद्याचा राजा गुमानसिंग, चरखारीचा राजा खुमानसिंग आणि पन्न्याचा राजा अनिरूद्धसिंग व दिवाण बेनीहूजुरी याजबरोबर वॉरेन हेस्टिंग्जने सलोख्याचे संबंध प्रस्थापित केलेच होते.[९] कर्नन अप्टन १२ हत्ती, ५०० ते ७०० माणसे इतका मोठा लवाजमा घेऊन ९ नोव्हेंबर १७७५ रोजी बुंदेलखंडाचे प्रवेशद्वार काल्पी येथे पोहोचला. बाळाजी गोविंद याने त्यांचे जातीने उत्तम स्वागत करून उत्कृष्ट व्यवस्था केली. सखाराम बापूंनी पाठविलेले परवाने कर्नल अपटन याला सादर करण्यात आले.[१०] कर्नल अप्टन बुंदेलखंडातून पुरंदर येथे २८ डिसेंबर १७७५ रोजी पोहचला आणि १ मार्च १७७६ रोजी पुरंदरचा तह झाला. त्या तहानुसार रघुनाथरावाला पेन्शन देण्याचे पुणे दरबाराने मान्य केले.[११] वॉरेन हेस्टिंज आणि सुप्रीम कौन्सील यांचा हस्तक्षेप मुंबईचा गव्हर्नर हॉर्नबी याला पसंत पडला नाही. रघुनाथराव मुंबईस ११–११–१७७६ रोजी इंग्रजांच्या आश्रयास आला. परंतु इंग्लंडच्या संचालकांनी सुरतचा तह मान्य केल्याचे पत्र आल्यामुळे मुंबईकर इंग्रजांनी पुरंदरच्या तहाची विल्हेवाट लावून रघुनाथरावाला पुणे येथे पेशव्यांच्या गादीवर बसविण्याचे ठरविले. या गोष्टीला वॉरग हेस्टिंग्ज याने मान्यता दिली आणि २६ फेब्रुवारी १७७८ रोजी कळविले की तुमच्या मदतीकरिता आम्ही काल्पीजवळ सैन्य (Sronng Anmv) जमा करू जाणि बुंदेलखंडातून मुंबईकडे पाठवू.[१२]

कर्नल लेस्ली –

वॉरन हेस्टिंगने रघुनाथरावाला आणि मुंबईकर इंग्रजांना मदत करण्याकरता बुंदेलखंडातून इंग्रजी सैन्य पाठविण्याचे ठरविले. त्याने 'आम्ही फ्रेंचापासून मुंबईचे रक्षण करण्याकरिता सैन्य पाठवित आहों' अशी घोषणा केली. त्यामुळे बुंदेले संस्थानिकांची अशी भावना झाली की इंग्रजांचे सैन्य बुंदेलखंडातून मराठ्यांविरुद्ध जात नसून फ्रेंचाविरुद्ध जात आहे. त्यामुळे बुंदेले संस्थानिकांनी इंग्रजी सैन्यास विरोध केला नाही, उलट मदत केली. परंतु बुंदेलखंडातील मराठा सुभेदार बाळाजी गोविंद

आणि गंगाधर गोविंद खेर, पन्न्याचा राजा अनिरुद्धसिंग या सर्वांना पत्र पाठवून इंग्रजी सैन्याला बुंदेलखंडातून जातांना कोणत्याहि प्रकारचा अडथळा न करता धान्यसामग्री वगैरेचा पुरवठा करण्याबाबत कळविले होते. बुंदेले राजांनी इंग्रजी सैन्याला मदत देण्याचे आश्वासनहि २० मे १७७८ रोजी दिले. [१३]

तेव्हा कर्नल लेस्लीच्या नेतृत्वाखाली ६००० सैन्य पाठविण्यात आले. लेस्ली सैन्यासह यमुनानदीच्या काठी काल्पीच्या पैलतीरी १८ मे १७७८ रोजी आला.[१४] काल्पीचा किल्ला आणि सुभा गोविंदपंत बुंदेल्याचा जेष्ठ पुत्र बाळाजी आणि धाकटा मुलगा गंगाधर खेर यांच्या अधिकारात होता, बाळाजी गोविंद अत्यंत धूर्त आणि पराक्रमी होता. गुलसराई आणि जालवण बाळाजीचा चुलत भाऊ दिनकरराव अण्णा (बाबुराव नरसीचा मुलगा) याच्या अधिकाराखाली होते. त्यांच्यामुळे मराठ्यांची सत्ता टिकून होती.[१५] नाना फडणविसांनी खेर बंधूस कर्नल लेस्लीचा मार्ग बंद करण्याचे आदेश अंतस्थपणे पाठविले होते. लेस्ली आणि गोडार्ड यांनी काल्पीला खेर बंधूस पत्रे पाठवून मराठ्यांच्या मुलखातून इंग्रजी सैन्य निर्विघ्नपणे जाऊ देण्या-बद्दल परवानगी मागितली. खेर बंधूंनी आपले वकील लाला नंदकुमार यास लेस्लीकडे पाठवून इंग्रजी सैन्य जाऊ देण्याचे आणि त्याबरोबर रसद पुरविण्याचे आश्वासन दिले. परंतु त्याबरोबरच धूर्तपणाचा सल्ला दिला की, आपण आपले सैन्य झाशी मार्गाने नर्मदेकडे पाठवावे. मी स्वत: मार्गदर्शन करीन.[१६] परंतु लेस्लीने बाळाजीचा सल्ला न मानता काल्पीमार्गे बुंदेलखंडातुन जाण्याचे ठरविले. इंग्रज सैन्याला विरोध करण्याचे बाळाजीने मनातून ठरविले होतेच त्यामुळे त्याने सैन्याला यमुना नदी ओलांडतांना होड्यांची मदत देण्यास नकार दिला.[१७] इंग्रज लोक होड्या दुरुस्त करीत असताना बाळाजीने सैन्याची तुकडी पाठवून गोळीबार केला. त्यावर प्रत्युत्तर म्हणून इंग्रजांनी गोळीबार केल्यावरच मराठा सैन्याच्या तुकडीने माघार घेतली.[१८] त्यावेळी खेरांचा वकील लाला नंदकुमार याने लेस्लीची भेट घेतली आणि झाल्या प्रकाराबद्दल क्षमा याचना करून लेस्लीला उत्तरेकडे ३० मैल जाऊन यमुना नदी ओलांडावी असे सुचविले. तेव्हा लेस्लीने हाही प्रस्ताव फेटाळला, आणि बाळाजीला नंदकुमार मार्फत कळविले की १९ मे १७७८ रोजी आम्ही सैन्य घेऊन यमुना नदी ओलांडणार आहोत.[१९]

बाळाजी गोविंदचा प्रतिकार –

बाळाजीने वकिलामार्फत लेस्लीने काल्पी मार्गाने बुंदेलखंडातून जाऊ नये म्हणून आटोकाट प्रयत्न केला. पण जेव्हा त्याला कळून चुकले की कर्नल लेस्ली काल्पीवरून

सैन्य नेण्यास हट्टाला पेटला आहे तेव्हा त्याने कर्नल लेस्लीच्या सैन्याला जोरदार प्रतिकार करण्याचे ठरविले. १९ मे रोजी इंग्रज सैन्याची पहिली फळी गोडार्ड च्या नेतृत्वाखाली यमुना नदी ओलांडू लागली तेव्हा बाळाजीने सैन्याची तुकडी पाठवून प्रतिकार केला. गोडार्ड ने बाळाजीकडे निरोप पाठवून सैन्य बिना विरोध जाऊ देण्यासाठी विनंती केली. तेव्हा बाळाजीने परवानगी तर दिली परंतु त्याबरोबरच इंग्रज सैन्यावर गोळीबारही केला त्यात काही इंग्रज सैनिक जखमी झाले, तेव्हा गोडार्ड यानेही गोळीबार केला. जोरदार लढाई होऊन दोन्हीकडील २०० माणसे ठार झाली. मराठा घोडेस्वारांनी माघार घेतली.[२०] तेव्हाच इंग्रज सैन्याला यमुना नदी उतरून येता आले.

काल्पीवर कर्नल लेस्लीचा ताबा –

कर्नल गोडार्ड ने सैन्याची एक फळी घेऊन काल्पी गावाकडे कूच केले. मेजर फुलर्टन ला डावीकडे सैन्य घेऊन लेस्लीने पाठविले होते. काल्पीचा किल्लेदार आणि बाळाजी यांनी १२०० घोडेस्वारानिशी फुलर्टनवर हल्ला केला, इंग्रजांच्या सुदैवाने फुलर्टन च्या मदतीसाठी सैन्याची सातवी बॅटेलियन वेळेवर आल्यामुळे फुलर्टनचा बचाव होऊ शकला. या चकमकीत इंग्रज सैनिकच ठार झाले. वेळेवर इंग्रज सैन्य मदतीकरिता आल्यामुळे मराठा घोडेस्वारांनी किल्ल्याचा आश्रय घेतला.[११] तेव्हा इंग्रजांनी काल्पी किल्ल्याला वेढा दिला. बाळाजी गोविंद याने एक महिना किल्ला शर्थीने लढविला. इतकेच नव्हे तर बुंदेलेराजे गुमानसिंग, खुमानसिंग आणि अनिरूद्धसिंग यांचीही इंग्रजाविरूद्ध मदत घेण्याचे प्रयत्न केले. परंतु बुंदेल्यांची फौज सामील न झाल्यामुळे बाळाजी गोविंद याला काल्पीचा किल्ला खाली करून द्यावा लागला.

कर्नल गोडार्ड याने काल्पी किल्ला आणि गाव२० मे १७७८ रोजी ताब्यात घेतले. कर्नल लेस्लीने बाळाजी गोविंद खेराशी तह केला. इंग्रज सैन्याला रसद पुरवावी आणि इंग्रज सैन्य निर्विघ्नपणे छतरपूरला पोहचल्यावर काल्पीचा किल्ला मराठ्यांना परत मिळावा असे ठरले.[२३] कर्नल लेस्ली याने काल्पीला अधिक काळ मुक्काम न करता श्रीनगर छतरपूर मार्गाने त्वरित जाण्याचे ठरविले. खरे बंधुचे धोरण गोड गोड बोलून तहाच्या वाटाघाटी एकीकडे करावयाच्या परंतु त्याजबरोबर इंग्रज सैन्याला पुढे जातांना प्रतिकारही करावयाचा असे होते. बाळाजीने पुण्याला पत्रे पाठवून शिवाजी विठ्ठल विंचूरकर यास सामील होण्यास सुचविले.[२४]

कर्नल लेस्लीच्या सैन्याला यमुना नदी ओलांडताना खेर बंधूकडून जो कडवा विरोध आणि प्रतिकार झाला त्याचे सविस्तर वर्णन १९ मे १७७८ रोजी कर्नल लेस्लीनेच कलकत्ता येथे पत्राने कळविले, तेव्हा गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलच्या बैठकीत याविषयी तीव्र वादविवाद झाला. कौन्सिलचे दोन सभासद फिलिप फ्रान्सीस आणि व्हिलर यांनी लेस्लीच्या सैन्याला बुंदेलखंडातून जाण्याविषयी तीव्र विरोध दर्शविला, आणि कर्नल लेस्लीला सैन्यासह परत बोलवावे किंवा पावसाळा संपेपर्यंत आगेकूच करू देऊ नये असे मत मांडले. परंतु वॉरेन हेस्टिंग्जने फ्रान्सिसचा सल्ला फेटाळून लावला आणि लेस्लीला पुढे जाण्याविषयी कळविले. अवघ्या एका आठवड्याच्या आत मराठ्यांच्या मुलखातून सैन्य पुढे जाऊन बुंदेले राजांच्या हद्दीत जाईल असा विश्वास त्याला वाटत होता.[२५]

बाळाजी गोविंदचा गनिमी हल्ला -

बुंदेलखंडाचे प्रवेशद्वार काल्पी येथील किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला तरी खेर बंधूनी बिलकूल धीर न सोडता लेस्लीच्या सैन्यास पुढे न जाऊ देण्याचा निर्धार केला, आणि ५००० सैन्य घेऊन पाळतीवर राहिले. इकडे तह झाल्यानंतर लेस्लीने आपल्या सैन्याच्या पाचव्या डिव्हिजनला काल्पींवरून पुढे जाण्यास रात्री दोन वाजता आदेश दिला. उन्हाळ्याचे दिवस व अतिशय ऊन असल्यामुळे रात्रीच सैन्य पाठविण्याचा निर्णय लेस्लीने घेतला. परंतु हा निर्णय लेस्लीच्या अंगलट आला, कारण काल्पीवरून जाताना त्याला मराठी जासुदांनी मुद्दाम चुकीचा मार्ग दाखविला. मार्ग अरण्यामय व अरुंद आणि दिवस उन्हाळ्याचे. इंग्रज सैन्याला पिण्यास पाणी मिळाले नाही. अनेक इंग्रज मरण पावले. चार इंग्रज अधिकारी बारापेक्षा अधिक इंग्रज शिपाई आणि शंभरापेक्षा अधिक 'नेटिव' सैनिक पाण्याविना तडफडून मरण पावले. त्यातही कॅप्टन क्रॉफोर्ड या उत्कृष्ट सेनानीच्या मृत्यूमुळे लेस्लीला धक्का बसला, तेव्हा तो स्वतः सैन्यासह निघाला. मृत इंग्रजांचे दफन करून मूरगाव या ठिकाणी ३ जून रोजी पोहोचला. तो सैन्यासह १५ जून रोजी जलालपूर येथे आला.[२६]

अनिरुद्धसिंग, गुमानसिंग व खुमानसिंग यांनी आपले वकील लेस्लीकडे पाठवून मदतीचे आश्वासन दिले. बुंदेले राजाच्या आपसातील संघर्षामुळे लेस्लीने बुंदेलखंडाच्या राजकारणात हस्तक्षेप करून आपला प्रभाव प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.[२७]

बाळाजीची मुत्सद्देगिरी

बाळ.जीचा बुंदेले राजावर प्रभाव होता. श्रीनगर येथे बाळाजी याने अनिरूद्धसिंग व त्याचा दिवाण बेणीहुजुरी, बांद्याचा र जा गुमानसिंग, चरखारीचा राजा खुमानसिंग आणि जैतपूर नरेश गजसिंग यांची भेट घेतली. जुने हेवेदावे विसरून सर्वांचा दुश्मन त्या इंग्रजायिरुद्ध एकत्र होण्याचे आवाहन केले. त्यात बाळाजीला यश आले. श्रीनगरहून बाळाजी छतरपूरला गेला व बेणीहुजुरीकडून त्याने सैन्याची मदत मिळविली. या संयुक्त सैन्याला गुमानसिंग आणि खुमानसिंगाचे सैन्य सामील होण्याचे ठरले. गंगाधर गोविंदवर काल्पीचा किल्ला जिकण्याची कामगिरी सोपविली होती. सागरहून विसाजी गोविंद चांदोरकर यालाही सामील होण्यास सांगितले होते. सर्वजण केन नदीच्या काठी राजगडजवळ जमले. कर्नल लेस्ली सैन्यासह जलालपूरहून बेलाह राठ मार्गे श्रीनगर येथे २७ जून रोजी पोहोचला त्या ठिकाणी उंचावर दगडी किल्ला आहे. तेथे १ जुलै पर्यंत त्याचा मुक्काम होता. बाळाजी गोविंद आणि बुंदेले नरेश यांनी लेस्लीचा छतरपूरकडील मार्ग रोखून धरला. गंगाधर गोविंद आणि विसाजी गोविंद हेही कुमक घेऊन येत आहेत असे लेस्लीला कळले. तेव्हा काल्पीचा किल्ला देण्यास लेस्ली तयार झाला. बाळाजीने लेस्लीला नर्मदेपर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले. लेस्लीने १ जुलै रोजी श्रीनगर सोडले, आणि छतरपूरकडे जाण्यासाठी अनिरुद्धसिंगाला परवानगी मागितली. अनिरुद्धसिंगाने दूत पाठवून रसद देण्याचे मान्य केले, परंतु बाळाजीने सुचविलेल्या मार्गाने आपणाला जाता येईल असे सांगितले. यावरून अनिरुद्धसिंगावर बाळाजीचा किती प्रभाव होता हे स्पष्ट होते.[२८]

बाळाजी गोविंदचे सैनिकी कौशल्य –

बाळाजी याने राजगढच्या वाटेवरील मऊ किल्ल्याच्या संरक्षणाकरिता ७०० घोडेस्वार, २००० पायदळ, ९ तोफा हिम्मतखानाच्या नेतृत्वाखाली ठेवले. मदतीसाठी १००० घोडेस्वार आणि पायदळाची व्यवस्थाही राजगढ किल्ल्याजवळ त्याने केली. राजगढ आणि केन नदी यांच्यामध्ये बाळाजी स्वत: तीन सेनापतींबरोबर सैन्यासह राहिला. टेकडीच्या पायथ्याशी केन नदीपासून चार मैल अंतरावर आणि पन्न्यापासून सहा मैलावर अनिरुद्धसिंहाजवळ ५०० घोडेस्वार, ४००० पायदळ आणि २० तोफा दिल्या. खेडूतांनी कोणत्याही प्रकारची रसद इंग्रजांना पुरवू नये अशी ताकीद देण्यात दिली. अशा प्रकारे बाळाजी, बेणीहुजुरी, अनिरुद्धसिंग यांनी कर्नल लेस्लीच्या प्रतिकारासाठी संरक्षणात्मक फळी उभारली.[२९] याच सुमारास बांदा आणि चरखारी येथील राजांनी कर्नल लेस्लीकडे वकील पाठवून जैतपूरच्या गजसिंगाचा प्रदेश जिकण्यासाठी बोलणी केली. ही बातमी बाळाजीला कळताच त्याने दोघांची भेट घेऊन जैतपूर

आणि कुलपहाडियाचा प्रदेश जिंकून तुम्हाला देऊ असे आश्वासन दिले.[30] वरील विवेचनावरून बाळाजी गोविंदची सैनिक प्रतिभा व प्रभाव आणि त्याच्या हुकुमानुसार बुंदेलखंडाचे राजे वागत होते असे दिसते, बाळाजी गोविंदने कर्नल लेस्लीच्या पिछाडीकडून दळणवळण आणि रसद तोडली. इतकेच नव्हे तर काल्पीवरून कॅप्टन मन्रो घोडेस्वारांची तुकडी घेऊन कर्नल लेस्लीकडे निघाला असताना त्याची निर्घृणपणे हत्या करण्यात आली.[31] लेस्ली याने बाळाजींवर आक्रमण न करता मऊ किल्ल्यावर आक्रमण करण्याचे ठरविले. आणि कर्नल गोडार्ड याने १० जुलै रोजी मऊचा किल्ला भयंकर प्रतिकारानंतर जिंकला आणि मराठ्यांच्या तोफा काबीज केल्या.[32] त्यामुळे बाळाजी, अनिरुद्धसिंग व इतर सरदार केन नदी ओलांडून पलीकडे गेले. ऑगस्ट महिन्यात लेस्लीने गुमानसिंग आणि खुमानसिंग याजबरोबर बोलणी केली व त्यांना बाळाजीपासून फोडले. दोघेही लेस्लीला जाऊन मिळाले.[33] तरी बाळाजी डगमगला नाही. अनिरुद्धसिंगने दोघेही बुंदेल्याशी गुप्तपणे बोलणी केली, तेव्हा त्या दोघांनी लेस्लीची छावणी सोडून ते परत बाळाजीकडे आले. तेव्हा लेस्लीने राजगढकडे कूच करण्याचा निर्धार केला.

मऊ येथील पराभवानंतर बाळाजी गोविंद लेस्लीच्या सैन्याला घेरण्याच्या व्यवस्थेला लागला, जेणेकरून लेस्लीला रसद मिळू नये, अनिरुद्धसिंगाकडे राजगढच्या किल्ल्याची व्यवस्था सोपविण्यात आली. मऊ आणि गोलगंजाच्या खिंडीवर सैन्य ठेवण्यात आले. ही व्यवस्था केल्यानंतर बाळाजी चौदा मैल सागरकडे पंचमनगरजवळ सैन्य घेऊन प्रतिकाराकरिता स्वतः थांबला. कारण त्या ठिकाणी कर्नल लेस्ली सोनार नदी ओलांडण्याची शक्यता होती.[34]

१७ ऑगष्ट रोजी लेस्ली राजगड येथे पोहोचला. परंतु तो केन नदी पुरामुळे आणि अनिरुद्धसिंगाच्या प्रतिकारामुळे ओलांडू शकला नाही. तीन महिनेपर्यंत लेस्लीचा मुक्काम राजगढ येथे होता. काल्पीचा किल्ला गंगाधर गोविंदकडे देण्यात आला. इंग्रज सैन्य काल्पीवरून परत बोलविण्यात आले. मराठा व बुंदेले सैन्यांनी लेस्लीचा कलकत्त्याशी होणारा संपर्क आणि दळणवळण तोडले. २९ ऑगष्ट ते ७ सप्टेंबर पर्यंत मुसळधार पावसामुळे लेस्लीचे फार हाल झाले. ३ ऑक्टोबर १७७८ रोजी राजगढ येथे लेस्ली मरण पावला. लेस्लीच्या जागी गोडार्डची नेमणूक सेनापती म्हणून झाली.[35]

बाळाजीचा कर्नल गोडार्डला प्रतिकार-

आठ ऑक्टोबर रोजी गोडार्ड सैन्यासह राजगडाहून निघाला. १२ ऑक्टोबर रोजी सागररोड वरील गोलगंज येथे पोहोचला. गोलगंजापासून सागर सुभ्याला सुरुवात होते. हा सुभा बाळाजीच्या अधिकाराखाली होता. जेव्हा गोडार्डचे सैन्य सागर सुभ्यात आले, तेव्हा बाळाजीच्या मदतीकरिता नाना फडणविसांच्या आदेशावरून शिवाजी विठ्ठल विंचुरकर सैन्य घेऊन आला आणि प्रतिकार करण्याची तयारी करू लागला.[३६] १८ ऑक्टोबर रोजी गोडार्ड हिरापूर[३७] येथे पोहोचला. बाळाजी गोविंद याने गोडार्ड-ला सागरवरून न जाता हिरापूर मालथन जवळून जाण्यास सुचविले. बाळाजीने सुचविलेला मार्ग चौदा मैल लांबचा होता. परंतु गोडार्डला बाळाजीचे ऐकण्याशिवाय गत्यंतर नव्हते. बाळाजीची स्थिती शिवाजी विठ्ठलच्या मदतीमुळे मजबूत झाली होती.[३८] गोडार्ड मालथन[३९] मार्गाने १ नोव्हेंबर रोजी खिमलासा[४०] या ठिकाणी पोहोचला. ४ नोव्हेंबरला सागर सुभ्याचे शेवटचे गांव करंडा[४१] या ठिकाणी तो आला. ५ नोव्हेंबर रोजी बाळाजी आणि शिवाजी विठ्ठल यांनी ५००० घोडेस्वारानिशी गोडार्ड च्या सामानावर मागच्या बाजूने हल्ला केला व काही ऊंट आणि घोडे काबीज केले.[४२] बाळाजीच्या या वर्तनामुळे गोडार्ड चिडून गेला. आणि त्यास कपटी, कावेबाज, धूर्त, विश्वासघातकी अशी विशेषणे लावू लागला. बाळाजी दररोज १००० सैन्यानिशी गोडार्डच्या सैन्याच्या पातळीवर होता. गोडार्ड बुंदेलखंडातून निघून २० नोव्हेंबर रोजी भोपाळला पोहचला.[४३]

बाळाजीचे लेस्ली आणि गोडार्डच्या बुंदेलखंडातील मार्गाक्रमणाच्या संदर्भात मूल्यांकन -

१२ एप्रिल ते २० नोव्हेंबर १७७८ पर्यंत जवळ जवळ सात महिने बाळाजी गोविंद खेर याने बुंदेले राजांच्या मदतीने सर्व प्रकारचे डावपेच मुत्सद्दीगिरी, रण-कौशल्य आणि सामर्थ्य पणास लावून प्रथम कर्नल लेस्ली आणि नंतर कर्नल गोडार्डच्या सैन्याला नानाप्रकारे अडथळा निर्माण करून हैराण केले. वॉरेन हेस्टिंग्ज आणि कलकत्ता कौन्सिल यांना वाटत होते की कर्नल लेस्ली आपले सैन्य घेऊन आठ दिवसात बुंदेलखंड ओलांडून जाईल. परंतु ही आशा बाळाजीने पार धुळीस मिळविली. इंग्रज सैन्यास बुंदेलखंड ओलांडण्यास तब्बल सात महिने लागले. बाळाजीने कर्नल लेस्ली आणि कर्नल गोडार्ड याजबरोबर अनेक वेळ तह केला, व 'मराठाराष्ट्र हित' लक्षात घेऊन तो तह पाळण्याचे बंधन मानले नाही इंग्रज सैन्याची आगेकूच सतत अडथळा आणि प्रतिकार करून थोपविली. त्यांना रसद मिळू न देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यामुळे इंग्रजांनी बाळाजीला विश्वासघातकी, धूर्त, कावेबाज इत्यादी

दुषणे लावली. बाळाजीच्या प्रखर विरोधामुळेच कलकत्ता येथील कौन्सिल मध्ये लेस्लीचे सैन्य परत बोलाविण्याबाबत तीव्र वादविवाद होऊन व्हीलर आणि फ्रान्सिस या दोघा सभासदांनी आपली कडक नापसंती दर्शविली. बाळाजी गोविंदने कर्नल लेस्ली आणि कर्नल गोडर्ड याना प्रतिकार केला नसता, आणि मराठा साम्राज्याचे दोन आधारस्तंभ भोसले आणि गायकवाडाप्रमाणे इंग्रजांना मदत केली असती तर कर्नल लेस्ली आणि गोडार्डच्या सैन्याची मदत मुंबईकर इंग्रजांना वेळेवर मिळून रघुनाथरावाला पेशव्याच्या मसनदीवर बसविता आले असते आणि १७७९ मध्येच मराठा स्वातंत्र्याचा सूर्य मावळला असता. नंतर २० वर्ष पर्यंत मराठ्यांचे स्वातंत्र्य आणि मराठ्यांची बुंदेलखंडातील सत्ता कायम ठेवण्याचे श्रेय नाना फडणवीस, महादजी शिंदे, हरिपंत फडके, परशुराम भाऊ पटवर्धन, यशवंतराव होळकर यांच्या बरोबर बाळाजी गोविंद खेराला आहे हे पहिल्या इंग्रंज-मराठा युद्धाच्या संदर्भात आपणाला विसरता येणार नाही.

० ० ०

संदर्भ – ग्रंथ – सूची – टीपा

१) खरे कृत 'ऐतिहासिक लेखसंग्रह भाग ५ नं. १२६३ पा. २०४३–४४ नं. १२६४ पा. २०४८

२) The Third English Embassy to Poona (Mostyns Diary)– Gense– Banaji P. 198-202: सरदेसाईकृत काव्येतिहास पत्रे यादी वगैरे न. ५५ पा. ४६३–४६४

३) काव्यसंग्रह ऐ. पत्रे यादी पा. नं. ५५ पा. ४६४; खरे ५ नं. १३६० पा. २१४६; नं. १३६१ पा. २१४९, राजवाडे कृत 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' भाग १० नं. १३७ पा. ८९, नं. १३९ पा. ९०, नं. १४० पा. ९१, नं. १४२ पा. ९२

४) वाड कृत 'सवाई माधवराव यांची रोजनिशी' भाग १ नं. ८२ पान ७०

५) Forrest G. W. Selection from the Letters despatches and other state papers (preseroed iu the Bombay secretariat) Marathha series Vol I 218, Aitchison C. U. A. Collection of Trearies, Engagements & Sanads Vol VI (Bombay Presidency) P. 21.

६) Forrests Maratha Series I P. 238–239. Letter from Warren Hastings and his Council on 31st May 1775, खरे ५, नं. १४७० पान २३२७, नं. १५०१ पान २३७७.

७) राजवाडे - १० नं. १६७ पान ११५, Forrests - Maratha Series I Page 269–270.

८) Calendar of Persian Correspondence IV No. 1975 P. 345, No. 1976 P. 345: No. 1916 P. 336; No. 1982 P. 346, No. 2011 P. 351.
राजवाडे– १० न. १६७ पा. ११५

९) Foreign Department Secret Proceedings 10th July 1775, 24th July 1775.

१०) खरे ५ न. १५३० पा. २४१७ नं. १५४१ पा. २७३२.

११) खरे ५ नं. १७७४ पा. २५०० Aitchison Treaties VI 28; Forrests Maratha Series I P. 276–280.

१२) Forrests Maratha Series I P. 291, Letter of Warren Hastings G.G. on 26th Feb. 1778 Page 313.

१३) Calendar of Persian Correspondence V No. 921 P. 152–153 No. 885 P. 130.

१४) Samuel P. " An Historical Account of the settlement and possession of Bombay by the English East India Company and of the progress of the war with the Maratha Nation Published in 1781 Page 217.

१५) पारसनीस कृत ' मराठ्यांचे पराक्रम ' पा. १८६

१६) C. P. C. V No. 939 P. 158, War with Maratha Nations Page 219.

१७) Foreign Department Secret Proceedings 16th May 1778. Letter of Col. Lesslie.

१८) C. P. C. V No. 946 P. 160; War with Maratha Nation P. 219

१९) War with Maratha Nations Page 220.

२०) अप्रकाशित पत्र नं. ४५१ रूमाल न. ७३ फाईल नं. १;बी मेणवली दप्तर, डेक्कन कॉलेज, पुणे; C. P. C. V No. 946, Pege 160.

२१) War with Maratha Nations P. 221.

२२) अप्रकाशित 'बाळाजी गोविंदचे पत्र' रुमाल नं. ७३, फाईल नं. १ बी मेणवली दप्तर, डेक्कन कॉलेज, पुणे. C. P, C. V No. 946, Page 160.

२३) War with Maratha Nations Page 222; Forrests Letters Despatches – Foreign Deptt Vol II Page 613 8th June 1778; Bengal secret consultation 8th June 1778; Foreign Deptt Secret Consultations, 15th June 1778; C. P. C, V No. 946 P. 160.

२४) अप्रकाशित पत्र नं. ४५१ रुमाल नं. ७३ फाईल १ बी मेणवली दप्तर, डेक्कन कॉलेज, पुणे.

२५) Selection from state papers – Foreign Deptt II Page 615, War with Maratha Nations, Page 229, मराठ्यांचे पराक्रम पा. १८८ Mill James 'History of British India' vol V Page 26–27. Bengal Secret consultation 8th June 1778, Sixth Report from the Committee of Secrecy.

२६) राजवाडे १०, नं. १९०, १९१ पान १३२–१३३; Shejwalkar's Nagpur Affairs II No. 15 P. 78, सैय्यद गुलाम हुसेन कृत 'सियार मुताखरीन भाग III' पा. ११३–११४ War with Maratha Nations Page 231–233. Letter of 4th May 1778 from Bombay Govt. Foreign Deptt. Secret Consultation – 15th June 78. सरदेसाई

यांनी ' मराठी रियासत उत्तर विभाग १ पान १५१ वर कर्नल पारकर, फुलरत्न, अश कॅप्टन आर्क्स मरण पावले ' ही माहिती बरोबर नाही '; C. P. C. V No. 1141 – Page 218; 1190 Page 230–231, No. 1192 P. 231 No. 1017 P. 181.

२७) Pogsons ' History of the Bundelas ' Page 106, 117; C. P. C. V No. 921 Page 152.

२८) Foreign Deptt secret consultations 30th June 1778 Letter of Col. Lesslie; C. P. C. V No. 1037 page 187, 188; War with the Maratha Nation, page 233.

२९) War with the Maratha Nation page 237; Foreign Deptt Secret Consultations 30th July 1778 No. 3.

३०) संशोधनाकरिता निवडलेले कागदपत्र रु. ९. अप्रकाशित पेशवे दप्तरखाना Alienation office Pune.

३१) War with Maratha Nation P. 241, C. P. C. V No. 1314, 1316, 1317, page 267 to 263.

३२) War with Maratha Nation page 244–45, Foreign Deptt Secret Proceedings 2nd Nov. 1778. Col, Lesslie Letter of 15th July.

३३) C. P. C. V No. 1114 page 208, No. 1115 page 208.

३४) War with Maratha Nation page 248–249, Foreign Deptt Secret Proceedings 2nd Nov. 1778. Col. Lesslies Letter of 20th August 1778.

३५) War with Maratha Nations page 263, Nagpur Affairs I No. 149 page 95, Seir. III page 114.

३६) अप्रकाशित पत्र नं. ४५१ रुमाल नं. ७३, फाईल १ बी डेक्कन कॉलेज, पुणे.

३७) हिरापूर बांदा तहसिल - सागर जिल्ह्यात लहानसे गांव व कानपूर रोडवर किल्ला सागर पासून ४७ मैल उत्तरेकडे. (सागर गॅझेटियर)

३८) War with Maratha Nation P. 265-266.

३९) मालथन–खुंरई तहसिल–सागर जिल्हा, सागर पासून ४० मैल झांसी मार्गावर.

४०) खिमलासा– खुरई तहसिलीत सागर पासून ४१ मैलावर वायव्येस.

४१) करंडा– खियलासा पासून २७ मैलावर.

४२) अप्रकाशित पत्र ४५१ रुमाल नं. ७३, फाईल नं. १ बी. मेणवली दप्तर डेक्कन कॉलेज, पुणे.

४३) Forrest Maratha Series I P. 345, C. P. C. V No. 1323, 1324. Page 271.

परिशिष्ट

Col LESLIE'S MARCH THROUGH BUNDELKHAND FROM 12th APRIL TO 3rd OCTOBER 1778 A.D. TILL HIS DEATH AT RAJGARH AND SUBSEQUENTLY Col GODDARD'S MARCH ONWARDS.



नरहरिची ' पुष्पांजली '

डॉ. मु. ब. शहा

दत्तसंप्रदायी निंबराज दैठणकरांचे गुरु नरहरि स्वामी होते. आदि-नारायण – ब्रह्मदेव – अत्रि - दत्तात्रय – चांद बोधले - जनार्दन – एकनाथ– नरहरि -- निंबराज अशी परंपरा आहे. याच परंपरेतील वेडिया नागेशाच्या ' भावार्थ ग्रंथा 'चा परिचय ' संशोधक 'च्या सुवर्णमहोत्सवी विशेषांकात वाचल्याचे अभ्यासकांना स्मरत असेल.

नरहरि एकनाथांचे शिष्य. त्यांची ' पुष्पांजली ' सारखी दीर्घ रचना असल्याची नोंद कुठेही आढळत नाही. नरहरिचा नेमका काळ कोणता ? एकनाथांचा काळ शके १४५४ ते शके १५२१ आहे. नरहरि त्यांचे शिष्य होते. म्हणजे त्यांचा काळ पंधराव्या शतकाच्या शेवटी व सोळाव्या शतकाच्या प्रारंभीचा समजायला हवा. धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिरात व तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयात नरहरि कवीच्या नावावर विपुल रचना आहेत. पण त्या नेमक्या कोणत्या नरहरिच्या आहेत, हे निश्चित करणे कठीण आहे. मराठी वाङ्मय कोश भाग १ नरहरि नावाच्या एकूण ९ कवींची माहिती देतो. महिषासूरमर्दिनीची लोकप्रिय आरती रचणारा नरहरि व ' पुष्पांजलीं 'ची रचना करणारा नरहरि एकच की भिन्न हेही निश्चित सांगता येत नाही. मंडळात उपलब्ध झालेल्या दत्तसंप्रदायाच्या एका हस्तलिखितात क्रमाने नरहरि – निंबराज – वेडिया नागेश व वरददत्ताच्या रचना आहेत. पैकी या अंकात ५५० ओव्यांचा हा 'पुष्पांजली' ग्रंथाचा मूळ पाठ अभ्यासकांकरिता प्रकाशित करीत आहे. यथाकाळ याविषयीची अधिक माहिती प्रकाशित होईलच.

अध्याय १

श्री गणेशायेनमः । श्री सरस्वत्यै नमः । श्री गुरूवरद दत्तात्रयाय नमः ॥
वों नमोजी गणेशु । सकल सिद्धीचा वीकाशु ।
स्वयं प्रकाशि प्रकाशु । अनंद मूर्ति ॥१॥
आता वंदु सरस्वति । त्रैलोकिं जयेचि मति ।
सत्ता मात्रे नाचविति । त्रैलोक्या ते ॥२॥
मज न ये काहिं बोलणे । तझी इछा[1] ग्रंथ करणे ।
तरि आता वाग्देवींत राहाणे । ग्रंथकर्ती तुझी इछा ॥३॥
मग नमिला आदिगुरू । जो परात्पर आहे विचारू ।
त्याचा करावया निर्धारू । ग्रंथकर्ता कवि तुंचि ॥४॥
तो हा सखा अवधुत । प्रसन्न जेव्हा होत ।
मुकिया हातिं वदवीत । वेदार्थ अनुभविं ॥५॥
तो सखा प्रसन्न केला । तु नव्हेसि आपण जाला ।
आता काय उणे ज्ञानाला । स्वामि स्वये सांगतो ॥६॥
तरि मज ज्ञान अनुभव । राहावा आंगि सदैव ।
विसरे सदेह भाव । हे करणे तुझे हाति ॥७॥
ज्ञानासाटि अवघे झोंबति । तत्त्वज्ञाने विचार करिति ।
परि शरीर विकार न सुटति । तयां काय म्हणौनि ॥८॥
विषय कां सुटेना । नैश्वर हे सत्य वाटेना ।
अभिमान येउनि पाहुणा । ज्ञानाभिमान जडतसे ॥९॥
'**भावार्थ ग्रंथा**' ऐसा थोरू । तेथील पाहुनि विचारू ।
जो भुलला असे पामरू । त्यासि काय करावेंजि ॥१०॥
मग स्वामि सांगत । सर्व शास्त्राचे मथित ।
वाचितांच उत्तम गत । आचरता काय न्यूनता ॥११॥
तवं शिष्यांस सन्मुख बैसविले । शांस्त्रार्थि त्यासि बोधिले ।
बैराग्य बरवे हाति दिधले । तेव्हा सांगितली ज्ञानसिद्धि ॥१२॥

---

१ इच्छा

ते ज्ञानसिद्धि सांगायासि । प्रेम असावा दासापासि ।
न ये प्रेमा जरि त्यासि । आसन सिद्धि करवावि ॥१३॥
ते आसन सिद्धि बैसवेना । हेत तऱ्हि धरवेना ।
काहिंच तुज करवेना । तरि गुरु करि सामर्थ्यवान ॥१४॥
शाहाणियाने गुरु करावा । तेथे भावार्थ धरावा ।
ते केव्हा येईल अनुभवा । कृपा त्याचि जरि होय ॥१५॥
ते कृपा व्हावयासि । येक सेवा दिसति आम्हासी ।
किंवा हेत धरितां त्यां पासि । दया करतील येके समयी ॥१६॥
त्या पासि सत्य बोलावे । आपल्या अवगुणा सांगावे ।
कांटाळुन म्हणावे । ह्या त्याग कै ...... करवाल ॥१७॥
आपणाही ने दीन म्हणावे । स्मरणि जिव्हेसि लावावे ।
निद्रेसमयी चिंतावे । ध्यान श्रीप्रभूचे ॥१८॥
जरि चाड आहे भगवंताचि । अनास्छा[1] धरावी प्रपंचाचि ।
रज तमादि प्रकृतिचि । सांडि बरि असोदे ॥१९॥
आधि या मनास पुसावे । जरि वाटे तुज हीत करावे ।
तरि त्वां लाहा... पण धरावे । शोधावे संतासि ॥२०॥
संतापासी शरण होतां । मग तुज कायसी चिंता ।
ह्यात धरूनि भगवंता । चालता बोलता देखसी ॥२१॥
विषय विरक्ति व्हावि । चित्ते प्रत्यगा वृत्ति पाहावि ।
येकांत अखंड सेवि । गुणातीत पुरुष ॥२२॥
तेथुनि वृत्ति उठति । चहुंकडे रा... वेंधति ।
तरि तेहि अर्पि भगवंति । सहज विसावेल ॥२३॥
मन वोढून आणावे । ध्याना पासि ठेवावे ।
अथवा जायील तेथे स्मरावे । आपुलि वस्तु ॥२४॥
जो जो पदार्थ देखसि । लटिके नैश्वर्ये पाहासि ।
मग सहजचि चिळससि । दृश्य मायीक म्हणौनि ॥२५॥
जे जे वेळे कल्पना उठिली । ते वेळेसचि पाहिजे समजलि ।

---

१ अनास्था

साक्ष होउनि आपुली । दृष्टि दृष्ट अवलोका ॥२६॥
आधि धारणेत शरीर असावे । मन विचारात घालावे ।
दिवस रात्रि हेंच म्हणावे । मि कोण येथे कोणाचा ॥२७॥
चोऱ्यासीचें भय वागवोनि । त्राहें त्राहे म्हणोनि ।
निशंक जावे लोटांगणी । साधु संत सज्जना ॥२८॥
म्हणसि ज्ञान आहे कठिण । कैसे उमजेल आम्हा लागुन ।
पाहे पाहे मन घालुन । तुझे भक्तिस्तव उमजेल ॥२९॥
भक्ति न ये जरी करीता ।आवडि तऱ्हि येक देतां ।
स्नेह पाहाशि अनंता । येणे घडे तुज पासि ॥३०॥
स्नेह खरा बैसेना । मोक्ष इच्छा हि सुटेना ।
काहिंच मज करवेना । त्यास करू काये ॥३१॥
अवघिया गोष्टिने अवगला । सर्व कर्म करीतां ढिला ।
येके गोष्टिनें देखिला भला । मोक्ष इच्छा धरितसे ॥३२॥
साधनेविण मोक्ष । देखेल कैसा प्रत्यक्ष ।
या मनास उत्तम साक्ष । घडे कैसि ॥३३॥
सादर व्हावे गुरू आज्ञेस । जो सांगतील निज ध्यास ।
तेथें लावितां विश्वास । तुझ्या पुरतील मनोभावना ॥३४॥
आता येकला विश्वास देणे । अनुगृहित होउनि ध्यान करणे ।
ध्यानी पुजा समर्पुन । सुख गोष्टी सांगाव्या ॥३५॥
न्याहाळुनि अंतरि लक्षावा । लक्षुनि ध्यासि असावा ।
स्मरणिं मननिं धरावा । जे विस्मरण कदा होउ नेदि ॥३६॥
शरीराचे अवगुण । हे असति मना आधिन ।
याचा बरा खेद मानुन । विवेक काठि असावि ॥३७॥
ययां विषयांचा ठायिं । येकचि तऱ्हि आवड नाहि ।
काही सुख काही दुःख पाहि । भाविता ते ॥३८॥
शब्द बरे वाईट बोलणे । तेथे निंदा द्वेष करणे ।
ते दुःखवे अंतःकरण । श्रवणद्वारे ॥३९॥
मउ आणि असे कठिण । हे स्पर्शामाजि दोन्हि गुण ।
मृदिं सुखावोन । कठिणासी कुसमुसी ॥४०॥

सुशोभित आणि भ्यासूर । हे रूपाचे प्रकार ।
प्रेमा असोनि सधीर । होय नेत्रद्वारे ॥४१॥
दुर्गंध आणि सुगंध । परिमळाचा घ्राणि छंद ।
सुख दु:ख भेद । जेथे दिसती ॥४२॥
रस इंद्रियाहि दोनि प्रकार । सुरस अथवा विषाकार ।
यांत पाहाता उत्तम विचार । न दिसे अढळ पैं ॥४३॥
यां विषया आधिन व्हावे । तेव्हा शीत उष्में बोंधावे ।
काकुळत वाणे दिसावे । विकारे विषयांचे ॥४४॥
विषया वाचुनि आणीक । न दिसे इंद्रियांसि सुख ।
हा स्वभाव आलोलीक[1] । इंद्रियासि ॥४५॥
हे विषय मिथ्या अैसे । लटिके स्वप्न वैभव भासे ।
किंवा हरणासि दिसे । मृगजळ पुर ॥४६॥
मजपासि विचार करणे । विषय सोडणे किंवा धरणें ।
कळेल तुज याचा अवगुण । तेव्हां सांडी सहज चि ॥४७॥
नाहि पुरता विचार केला । आहाच परमार्था झोंबला ।
विषय घालितील घाला । यास्तव कां न सांगावे ॥४८॥
आता तन्हि करि विचार । कोण्हि येक आहे परमेश्वर ।
त्याज वांचुनि पैलपार । पांबविल अैसा कोण तो ॥४९॥
अद्यापि नाहि वैराग्य । तेथे ज्ञान घडे कैसे चांग ।
इंद्रिये सांगोपांग । वोढितीं आपणाकडे ॥५०॥
रोग्या आंगि दु:ख जाले । वैद्या घरि धावत आले ।
त्याने एक स्मरण मात्रेसि दिले । परि भेडसाविलें कुपथ्यासि ॥५१॥
मग अवघा येकरूप । जाणावे सर्वस्वरूप ।
तरि तुज अमुप । सुख ठसावे ॥५२॥
ना तरि स्तुति वादु करितां । किंवा अंतरि निश्चळता ।
अथवा स्वरूप न्याहाळिता । विसरेल सकळ प्रपंच ॥५३॥

---

१ अलैकिय

येके भावार्थे अैकावे । अैकुनि जिवी धरावे ।
प्राण त्याग होता न सांडावे । आपुलिये भक्तिस ॥५४॥
करू अैसे अवघे म्हणति । आचरतां बेबीळ होति ।
संगा सारखे पोवति । विकार त्यांचे ॥५५॥
कठिण संगे गयाळतो । असिला मार्ग नासतो ।
संगा सारिखा वर्ततो । यास्तव असावा सुसंग ॥५६॥
सुसंग असावा जातिचा । स्वधर्म आपुले शास्त्रीचा ।
जो नेमिला नेम दिधीचा । चालवणार आधिकारे ॥५७॥
कर्ता मी हे न म्हणावे । ईश्वर सत्ते जाणावे ।
शरीरे जेवी चालावे । तेवि चालणे छायेसि ॥५८॥
तरी अहंकार गाळोन । कल्पना जावि जिरोन ।
तरिच येईल कळोन । ज्ञान गर्भ ॥५९॥
ये-हवि सखा तो कैसा । होतो दासांचा कोवासा ।
आहे ज्याला भरवसा । त्यासि प्रसिद्ध दिसे ॥६०॥
आपुलेपण देऊनि । सर्वभावे संतोषवोनि ।
खद्योत जेवि दिनमणि । केला येकायेकि ॥६१॥
हे येक गुरू स्वामिचे हाति । भक्तिद्वारे मोक्षलाभ देति ।
शब्द भासे ज्ञान सांगति । तेणे पावति प्रसाद ज्ञान ॥६२॥
ये-हवि कळले ज्ञान हा ज्ञानाभिमान । ते नकळत आले अज्ञान ।
नाही साधन संपन्न । तोवरि शिकविले शब्द राव्याचे ॥६३॥
ज्ञानाभिमान साधकासि । बाधि मोटीया सिद्धांसी ।
जरि गुणदोष जगाचे पाहासि । तरि दोषी होसी तुंच कि ॥६४॥
जगास जो जैसा पाहातो । तो तैसाच स्वये होतो ।
या लागि सर्वत्र न्याहाळितो । आपुली वस्तु ॥६५॥
जन हे देवाच्या विभुति । तिन्ही देवाचे त्रिगुण असति ।
प्रकृति प्रमाणे नाचति । हेसत्ता श्री नाथाचि ॥६६॥
हे जाणोनियां मनांत । जो जगास वंदित ।
त्यांचि क्रिया जे होतजात । ते सत्ता ईश्वरी ॥६७॥

तुम्हीं आपुला मार्ग धरावा । कोण्हाचा द्वेष न करावां ।
तरिच भक्तराज बरवा । संतोष पावसी ॥६८॥
अरे हे सुबुद्धि कारणे । तुज सांगितले ज्ञान ।
तरी मन थिराउन । सांगेन ते अैकपां ॥६९॥
मियां सांगितले ते ऐकावे । साटि घडीस नमावे ।
त्यात भजन समयि असावे । हरूष जैसा भोजन वेळे भुकेला ॥७०॥
पोथितरि अैकत बैसलासि । चित्त गेले आणिका उद्वेगासि
तरि अैकिले ते होसी । नायिकण्या सारीखा ॥७१॥
थोर उदंड का होईना । नित्त्य नेमि गयाळवाणा ।
त्याचा मार्ग कंटाळवाणा । पाहु नये ॥७२॥
ज्यास विषयाची आवडि । द्रव्य दारे पासी गोडी ।
त्यांसि भजन परवडि । बोलु नये ॥७३॥
ज्ञान सांगुन नेटका । मुखे म्हणे संसार लटका ।
परोपकार जयास फुका । कवडिचाही न होय ॥७४॥
अगत्य अले दारापासि । त्यास देखुनि कुसमुसी ।
अगत्यास सभाग्य न एसि । सर्व काळ पाहुणेर ॥७५॥
द्रव्यवंत आणि कृपण । करंटा होउनि हव्यास धरणे ।
येकां धर्म येकां तप करवणे । तरिच येउं द्यावे जवळी ॥७६॥
ना तरि कायशा रिकामवटचा । भांडा ऐसा चावटचा ।
गोस्टी सांगति मोठमोठ्या । अनुभवापुढे दडताति ॥७७॥
आता सांगावे कोणास । बोलावे आप आपणास ।
सोहं हंस निजध्यास । हाच का जिधरूना ॥७८॥
जनाचि प्रकृति येति । मोझे आंगि झोंबति ।
त्याचे संगे चळोन जाति । विस्मरण अजपजपाला ॥७९॥
अजपा जपांत राहिला । योग सिद्धि तो आला ।
जप त्याचा नेमिला । तो करूनि आधि पाहे रे ॥८०॥
आधि साधुं समागमे व्हावे । विवरावे शास्त्र अवधे ।
मग नेमे बसत जावे । अजपाजपासी ॥८१॥
जप तो कैसा करावा । तोहि अैक बरवा ।
आसनि दृढ राहावा । क्षराक्षर लक्षित ॥८२॥

सकार तो चढतो । हकार पुरूष उतरतो ।
अभ्यास ढाळे लयस्त होतो । तेचि श्रु शुम्ना बोलति ॥८३॥
आता हेंचि अभ्यासा । धरा छंद सोहं हंसा ।
स्छिर होतात... मासा । योग सिद्धिहि बाणेल ॥८४॥
हा ज्यास नसेल अनुभव । त्यासि न ये अैक्यता भाव ।
येऱ्हि साधने नव्हे देव । प्रत्यक्ष होतो आपण कि ॥८५॥
स्छिर चित्ते अनंद भरित । आपला अवघा वीट मानित ।
मन बुद्धि ठेवित । माथा पवनाच्यां ॥८६॥
पवन पांगोळन गेला । मग सहज निर्विकल्प जाला ।
शरीर साक्षि तयाला । वाटे दुसर से ॥८७॥
ते साक्ष येति काशाने । सोहं सिद्धि कोटि जपाने ।
हे घ्यावे करावे अज्ञाने । ज्यास चमत्कार बाणला ॥८८॥
त्याचि सेवावृत्ति करितां । अथवा सख्य भक्ति धरिता ।
त्याज सारिखे पद प्राप्तता । येईल षण्मासा ॥८९॥
ना तरिं मुद्रा ध्यानि विश्वास । होऊ द्यावा स्वयंप्रकाश ।
आठउनि अंतरि जगन्निवास । श्रुचित्व राहटूनि ॥९०॥
ज्ञानियाचा उगाच संवाद । तीर्थास जाणे काय संमध ।
हाति येता तत्त्वार्थ निध । मग न लगेच काहि ॥९ ॥
तो गोष्टिने हातास येतो । तत्वि तत्व निवारितो ।
मि साक्षि ज्याला म्हणतो । तो कां हुंबतो मिपणे ॥९२॥
ज्ञानियांसि सर्वत्र देखणे । मिं ब्रह्म साक्षात्पूर्ण ।
मज माझे तुझे हे आलिंगण । सत्ता नायिक तो येक ॥९३॥
यासि व्हावया उपासना । करावि येकि धारणा ।
मज माजि मिंचि होऊना । वृत्ति श्रुन्ये[1] ॥९४॥
आलि वृत्ति त्यागावि । पाहात अखंड असावि ।
तेव्हाच विवेक निरसावि । सर्व साक्षत्वे ॥९५॥

---

१ शून्ये

जगाकडें पांहुं नये । बरे वायिट विचारू नये ।
आल्या भोगा रूसु नये । देवावरि ॥९६॥
प्रालब्ध योग आहे जैसा । तो वर्तवि कर्मा तैसा ।
तु भोगी त्या वेशा । वेगळा साक्षि ॥९७॥
हे तुज होय कि न होय । त्याचा पाहे मनि उपाय ।
भजन तर्न्हि करिसी काय । हा निर्धार सांगावा ॥९८॥
यास्तव ते यात्रा करी भले । जर्न्हि घर त्यागून काशी निघाले ।
ते जन्मांतरि पावले । मोक्ष सुख ॥९९॥
ते तात्काळ निघाले । द्रव्य वेचुनि श... कष्टले ।
सख्य ईश्वरे ते केले । ज्ञानप्राप्ति सिध्दार्थे ॥१००॥
ज्ञान सांगुन शरीर पोसि । द्रव्य दारा अभिळाशि ।
न झोंबे का तपासि । तया ... प्राप्तर्थु ॥१॥
संत समागमि मन यावे । ते सांगतिल ते करावे ।
ते मन विश्वासे राखावे । ... तुज आनंदु ॥२॥
तुम्हासहि याचा उमज । नरदेहास्तव सहज ।
तरि हेहि येव्हढे काज । धरा मनि ॥३॥
नाहि हाति पोथी धरिलि । तोवरीच माझी तुझी बोलि ।
येथील वोवि जिहि वाचिलि । त्यासि येकपण कळेल ॥४॥
तो हा पैहिला अध्याई । येकनाथा तुझी नवायि ।
हे अैकता मोक्ष उपाई । असोत प्राणि ॥५॥
अरे हे अैसे वाचावे । सुचित मनें पाहावे ।
मग कर्मणुकेसि ठेवावे । मुखी नाम ॥६॥
आतांचि हातास यावे । मोक्ष पद पावावे ।
त्याणे अजपा जपि राहावे । व्रतस्छ ब्रह्मचर्ये ॥७॥
सांग स्वामि विद्येचा । माथा हात कृपेचा ।
फुला करूनि वोविचा । येकनाथि अर्पण ॥८॥

१ शून्ये

सकार तो चढतो । हकार पुरूष उतरतो ।
अभ्यास ढाळे लयस्त होतो । तेचि श्रु शुम्ना बोलति ॥८३॥
आता हेंचि अभ्यासा । धरा छंद सोहं हंसा ।
स्छिर होतात... मासा । योग सिद्धिहि बाणेल ॥८४॥
हा ज्यास नसेल अनुभव । त्यासि न ये अैक्यता भाव ।
येऱ्हि साधने नव्हे देव । प्रत्यक्ष होतो आपण कि ॥८५॥
स्छिर चित्ते अनंद भरित । आपला अवघा वीट मानित ।
मन बुद्धि ठेवित । माथा पवनाच्यां ॥८६॥
पवन पांगोळन गेला । मग सहज निर्विकल्प जाला ।
शरीर साक्षि तयाला । वाटे दुसर से ॥८७॥
ते साक्ष येति काशाने । सोहं सिद्धि कोटि जपाने ।
हे घ्यावे करावे अज्ञाने । ज्यास चमत्कार बाणला ॥८८॥
त्याचि सेवावृत्ति करितां । अथवा सख्य भक्ति धरिता ।
त्याज सारिखे पद प्राप्तता । येईल षण्मासा ॥८९॥
ना तरि मुद्रा ध्यानि विश्वास । होऊ द्यावा स्वयंप्रकाश ।
आठउनि अंतरि जगन्निवास । शुचित्व राहटुनि ॥९०॥
ज्ञानियाचा उगाच संवाद । तीर्थास जाणे काय संमध ।
हाति येता तत्त्वार्थ निध । मग न लगेच काहि ॥९ ॥
तो गोष्टिने हातास येतो । तत्वि तत्व निवारितो ।
मि साक्षि ज्याला म्हणतो । तो कां हुंबतो मिपणे ॥९२॥
ज्ञानियांसि सर्वत्र देखणे । मिं ब्रह्म साक्षात्पूर्ण ।
मज माझे तुझे हे आलिंगण । सत्ता नायिक तो येंक ॥९३॥
यासि व्हावया उपासना । करावि येकि धारणा ।
मज माजि मिंचि होऊना । वृत्ति श्रुन्ये[1] ॥९४॥
आलि वृत्ति त्यागावि । पाहात अखंड असावि ।
तेव्हाच विवेक निरसावि । सर्व साक्षत्वे ॥९५॥

---

१ शून्ये

जगाकडें पांहुं नये । बरे वायिट विचारू नये ।
आल्या भोगा रूसु नये । देवावरि ॥९६॥
प्रालब्ध योग आहे जैसा । तो वर्तवि कर्मा तैसा ।
तु भोगी त्या वेशा । वेगळा साक्षि ॥९७॥
हे तुज होय कि न होय । त्याचा पाहे मनि उपाय ।
भजन तर्‍हि करिसी काय । हा निर्धार सांगावा ॥९८॥
यास्तव ते यात्रा करी भले । जर्‍हि घर त्यागून काशी निघाले ।
ते जन्मांतरि पावले । मोक्ष सुख ॥९९॥
ते तात्काळ निघाले । द्रव्य वेचुनि श... कष्टले ।
सख्य ईश्वरे ते केले । ज्ञानप्राप्ति सिध्दार्थे ॥१००॥
ज्ञान सांगुन शरीर पोसि । द्रव्य दारा अभिळाशि ।
न झोंबे का तपासि । तया ... प्राप्तर्थु ॥१॥
संत समागमि मन यावे । ते सांगतिल ते करावे ।
ते मन विश्वासे राखावे । ... तुज आनंदु ॥२॥
तुम्हासहि याचा उमज । नरदेहास्तव सहज ।
तरि हेहि येव्हढे काज । धरा मनि ॥३॥
नाहि हाति पोथी धरिलि । तोवरीच माझी तुझी बोलि ।
येथील वोवि जिहि वाचिलि । त्यासि येकपण कळेल ॥४॥
तो हा पैहिला अध्याई । येकनाथा तुझी नवायि ।
हे अैकता मोक्ष उपाई । असोत प्राणि ॥५॥
अरे हे अैसे वाचावे । सुचित मनें पाहावे ।
मग कर्मणुकेसि ठेवावे । मुखी नाम ॥६॥
आतांचि हातास यावे । मोक्ष पद पावावे ।
त्याणे अजपा जपि राहावे । व्रतस्छ ब्रह्मचर्ये ॥७॥
सांग स्वामि विद्येचा । माथा हात कृपेचा ।
फुला करूनि वोविचा । येकनाथि अर्पण ॥८॥

---

१ शून्ये

मज काशास बोलणे । जे नाहिं ते भागवति पाहणे ।
त्या पाह्यासाठी करवणे । हा बोध तुज येयील ॥९॥

ज्ञानेश्वरी पाहावि । आचरत्या मुखें अैकावि ।
ते अर्थि ठेवावि । दृष्टि आपली ।१०॥

विवेंक सिंधु तत्त्वार्थि निवाडा । येकला अवघे वस्तूचा झाडा ।
मुकुंद स्वामिचा पवाडा । अद्यापि गाति ॥११॥
यासि श्रवण करावे । गुरूमुखे विचारावे ।
काहि येक तप करावे । जे मन राहे निराभिमानी ॥१२॥

भूतदया असावि । विरक्ति आंगि नांदावि ।
मग हे मऱ्हाष्ठ शास्त्रे पाहावि । संत सज्जनाचे मुखे ॥१३॥
पुराण श्रवण करावे । राहाटिस चोखट दिसावे ।
लोकिकि हि दंडकि लावावे । आप्त सज्जन वोळखी ॥१४॥
होणार जाणार हे पूर्वं संचित । त्यासारिखे कर्म राहाटत ।
पूर्वि असिला निज भक्त । आतांहि बुद्धि हे त्याचि ॥१५॥

कृपा देवे अैसि करावि । भक्तिचि गोडी मज लावावि ।
ते गोडी लागतां स्वभावि । आनंद माझा मज होय ॥१६॥
मन नाहिं येक निष्ठ । तोंवरि हें अवघे कष्ट ।
पोथी स्वामिचि वोले पष्ट । स्पष्टोतरि नांव इयेचे ॥१७॥
याचें नाव प्रत्यक्ष साक्षात्कार । श्रवणें तुटे विकार ।
येका जनार्दनाचा नरहर । पुष्पांजुलि अर्पण ॥११८॥
इति श्री पु ष्पांजुळि ग्रंथ प्रथम अध्याय संपूर्णमस्तु ॥

अध्याय २ रा

श्री गुरूदत्तो जयति ।

वो नमो सग्दुरू परमहंस । तुझे बोधे होय विकाश ।
करूनि कृपामात्रे प्रकाश । सुखी केले भक्तजन ॥१॥
तुझे मनि कृपा करणे । तरि ग्रंथ पाहाताच ज्ञान देणे ।
वाटे सत्त्य तेव्हां तुझेच बोलणे । ज्ञानसिद्धि कृपावंता ॥२॥
देव म्हणे माझे नाव बोलसि । मि बोलका तुजपासि ।
जितुकि या आशंका घेसि । फें......... ॥३॥

(पान क्र. ७, ८, ९ ही पाने गहाळ झाली आहेत. त्यात क्र. ४ ते ६८ ह्या ओव्या होत्या.)

० ० ० ०

। तुझा तु स्वामिनाथा ॥६९॥
वडिलाचा जो कर्मांग । तो चालउ निसाग ।
उपासना श्रीरंग । तो स्वामि कृपेचा ॥७०॥
तु म्हणसि आम्हि करावे । तरि ते अवघिया आहे ठावे ।
असोनि चमत्कारि नसावे । कुपथ्य त्यासि कोणते ॥७१॥
स्वधर्म करीता बुडाला । हा नाहि अैकीला ।
तप करिता व्यर्थ जाला । सांग त्या कोणत्या पुरुषासि ॥७२॥
कासिस जातांनाहि मळिन । भक्ति करीता नसे अपमान ।
हे तेव्हाच देतील समाधान । आहेतूक पणे ॥७३॥
शरीर अवघे देवाचे । तैसि भक्तिहि घडणे ।
हे त्याचे उत्तम अथवा वायिटाचे । बोझे त्याचे त्यास आर्पि ॥७४॥
तु काहीच नव्हेस ... ...
जगास देखे स्वप्नाभास । आदि पुरूषि उमटति ॥७५॥
अैकुनि कामना हीन । कामनेने जाले दिन ।
ते कामना सोडवणे । स्वामि सत्ता हे कोणाचि ॥७६॥
सत्ता आमुचि तुज कळो आलि । तेथे कामना तुझि विरालि ।
तरि हेच पाहिजे गोष्टि नेमिलि । तरि तुज कैचे अज्ञान ॥७७॥

लय लागो देवापासि । ह्यचि निजध्यास राहावा मानसि ।
जिरउनि अवघ्या वोढीसि । येकतत्त्वि असारे ॥७८॥
नित्य नेमाचे साधन । तुझा ध्यास तुवाच कारणे ।
त्याचि धरावया आठवण । प्रेमा आंगि राहावा ॥७९॥
पाप पदरि जरि आहे । त्यासि कदापि प्रिति न राहे ।
विकल्प होउनि साह्य । भजन मार्ग बुडवितो ॥८०॥
काहि एक अर्थ केला । वाटे त्यास ज्ञानिया जाला ।
नसत्या चर्चा करू लागला । साक्ष भूत म्हणउनी ॥८१॥
साक्षी जरि असता । घुर्मित नेत्रे लक्षिता ।
सर्वांतरिचे जाणे मनोगता । अनुसंधान बळे ॥८२॥
ते अनुसंधान करावयासि । स्वामिचा जो विश्वासी ।
त्याचे भावे त्याज पासि । लक्षित लक्ष प्रगटावा ॥८३॥
जागृतीत भ्रमिस्त वाटावे । निद्रेत जागे व्हावे ।
हे कैसेनि दिसावे । व्हावे जेव्हां उदासीन ॥८४॥
मन माझे अैकेना । तरि मिहिं यांचे काम करीना ।
दृढ घालूनि आसना । वेडाउनी ठक पडे ॥
आता तऱ्हि अैकसि । चालता बोलता नामस्मरसि ।
येयीना जरि मुखासि । मनिं तऱ्हि स्मराही ॥८६॥
लटकेपणे सद्गुरुस । मेळवि मन मनास ।
सेवक जैसा स्वामिस । कृपा त्याचि ईछीम ॥८७॥
त्याचे हृदयीचे जाणावे । पाहिजे ते आपण व्हावे ।
त्याज पुढे आवडिने गावे । भ्रमर जैसा कमळ पुष्पि ॥८८॥
नित्य गोडि दर्शनाचि । तैसीच आवड...
गोष्टि पुससि निदानिचि । शरीर व्हावे अर्पण ॥८९॥
तेथे मने घेतला त्रास । तरि जाणावे देवचि जाले उदास ।
त्याने पाहुनि गीतार्थास । बरेभाव धरावा ॥९०॥
जरि स्वामि अनाधिकारी । अवचटे गांठि पडली ।
तरि संत समागमे गोष्टि । खरी करूनि त्यास नमावे ॥९१॥

त्याने नेमला जो देव । तेथे धरावा भाव ।
चरि निंदु लागे स्वभाव । तरि उठोनि तपासि बा जावे ॥९२॥
त्यागाचि गोष्टि काहाडावि । ते अवघडसि वाटावि ।
लबाडकि आहे जिवि । अनुकूळ विषय भोगावा ॥९३॥
जरि विषय आहे अनकूल । तो दाटुनि करी प्रतिकूल ।
निसंग येकला निर्मळ । राहे आत्मभुवनांत ॥९४॥
जरि विषयो सुटेना । आणि भक्तिवीण राहवेना ।
त्याने संग शाहाणा । सुबुद्धिचा धरावा ॥९५॥
संगासारिखा आपण होतो । हा निश्चय वेद बोलतो ।
तो संग धुंडुन पाहतो । तप करावे स्मरणाचे ॥९६॥
तपहि अळशालागी होयीना । तो आर्जवी तऱ्ही का असेना ।
आर्जव करितां साधु सज्जना । पाहुणियांहुनि अधिक ते ॥९७॥
विश्वासे गोष्टि अैकावि । सांगीतलि जीवि धरावि ।
काहि तळमळ उठिलि ते पुसावि । लेकरू येकुलते त्यापरि ॥९८॥
आपले चित्तास पाहोन । जरि त्याचे चरणि तल्लिन ।
तरि त्यांचि कृपा संपूर्ण । जाणावि आपुले भक्तिने ॥९९॥
भक्ति सारिखे काहि सोपे । मुक्ति लाभे खऱ्या मापे ।
अनुभव ज्ञान अमूपे । आधि येति तयासि ॥१००॥
मनधर चित्त धरणि । खरेपणे राहा स्मरणी ।
जरि तो राहे उदासि । परि तुवा नसावे ॥१॥
त्यासि संभाषण असावे । नित्त्य मन पाहात जावे ।
मग तोहि स्वभावे । तुज पासिच असेल ॥२॥
थोडासा अंतराय येक । आपणा सारखि लोकिक ।
तरि म्हणावे नव्हे भाविक । यासाटि मजसि गुध्यार्थ ॥३॥
जो गुव्ध आपणासि धरित । तो नाहि कृपावंत ।
माझे कनिष्ट देखुनि चित्त । या लागि उदासी ॥४॥
पितियासि जैसे विचारि । घडला प्रसंग श्रुत करी ।
त्याहिहुनि आत्पता धरि । निराश्रया जेवि आश्रयो ॥५॥
सुखदुःख सांगावे । समाधान आपणच राखावे ।
केविलवाणे नसावे । प्रपंच वार्तेसि ॥६॥

जरि आहे अति संकट । तऱ्हि म्हणे माझे आहे निट ।
वेव्हारिक कष्ट । दूर होतील स्मरणे ॥७॥
परंतु हळहळीत बोलेना । संकट द्रष्टी सापडेना ।
जाला विश्वास सुटेना । नैश्वर्य पदार्थास्तव ॥८॥
नित्य भांडण विषयासि । साध्य करी सखा भक्तीसी ।
दृष्टांत होता निद्रेसि । विस्मित होउनि बैसे तो ॥९॥
चोरूनि साधना करितो । येकांति भक्ति धरितो ।
रामकृष्ण स्मरतो । कृपा व्हावया स्वामिचि ॥१०॥
मागे संत नामांकित । ते भक्ति... रांगत ।
त्याहि दृढ विश्वासे सदोदित । भक्ति केली देवाचि ॥११॥
अवघ्याहूनि श्रेष्ठ । सांगितलि भक्ति वरिष्ठ ।
येथे नाहित काहि कष्ट । विश्वासे असावे ॥१२॥
विश्वास स्वामि बैसेना । म्हणोनि जालो घाबरिवाणा ।
चुकावावया येम यातना । शरण आलो गुरूवर्या ॥१३॥
यातना माझी चुकवावि । दुष्ट कर्मे सुटावि ।
अैसे आहे तुझा जिवि । तरि खरा ध्यास राहो दे ॥१४॥
खरा ध्यास कळतो । दिवसे दिवसि उमटतो ।
सुखवासि गोष्ट मात्र बोलतो । आणि सुख देतो शरीर ॥१५॥
प्रचित केव्हांसि होयील । आणि निःशंक घरि बैसेल ।
बैसलीया दृष्टि काय पडेल । तातडच नाहि कामाचि ॥१६॥
जो उद्योग धरावा । तो प्रसंग तुज काहि दिसावा ।
उद्योगच कामाचा सोडावा । मग वाट काशाचि ॥१७॥
काहि केल्याविण होयीना । करावे काय हे कळेना ।
अंतरि धरि दृढ वासना । भगवंत प्राप्ति मज व्हावि ॥१८॥
सत्त्य त्याचि तुज आहे चाड । तरि तो न म्हणे पापी द्वांड ।
म्हणे माझे आहे लळिवाड । यास्तव सांभाळि ॥१९॥
किता येकां सांभाळिले । येके नामे वैकुंठा नेले ।
ते ब्रिद अद्यापि बाधिले । प्रीतीच्या भक्तास्तव ॥२०॥

येथुनि म्हणे निश्चयो जाला । पुष्पाजुळि अर्पि त्याला ।
सदा राहिन सोवळो । येकनाथा स्मरत हो ॥२१॥

सख्य भक्ति उदंड आहे । आंगि आरति रहे ।
तरि स्वामि सखा साठये । होय तात्काळ ॥२२॥

येथुनि वैराग्य सांगितले । त्रास चिळीसा उपजेल ।
सहजे ओखटे कवेल । प्रपंच हा असत्य ॥२३॥

भक्ति करिता फार धाला । स्वामि सांभाळि वेळोवेळा ।
येक नाथाचिया शब्दाला । नरहरि असे श्रवण हो ॥१२४॥

इति श्री तुष्पांजुळि द्वितीयोध्याय समाज २

अध्याय ३

वों नमो सद्गुरुनाथा । भावे चरणि ठेवुनि माथा ।
सांगावि वैराग्य कथा । त्रास उपजे वेव्हारि ॥१॥
मुर्खास त्रास येथीना । त्यासि विषय कठिण वाटेना ।
मुळ सांगितलेच अैकेना । अपस्मारपणे ॥२॥
त्याणे बाजारि बसावें । चावट्या घालित फिरावे ।
संत साधु निंदावे । हा स्वधर्मु तयाचा ॥३॥
दान धर्म तिर्थासि । जाणे आवडेना यात्रेसि ।
समयी आलिया विप्रासि । दान धर्म करवेना ॥४॥
द्रव्यहि थोडे बहुत । निश्चित पदरि असतां ।
आणि सदाचा जो हळहळित । तो पिशाच योनित जायील ॥५॥
श्राद्ध आणि पक्षाचा । त्रास व्रतातपाचा ।
द्वेष करीतो ब्राह्मणाचा । तो जायील भूतयोनी ॥६॥
आपुले कर्म सोडुन । अनयाति धर्म करून ।
स्छापि वेद ब्राह्म ज्ञान । तो पढत मुर्ख त्यागावा ॥७॥
दर्शनाहि भवत म्हणवि । त्यागांवाचुनि वैराग्य दावि ।
अंतर साक्षि नसावि । आणि म्हणवितो ज्ञानियां ॥८॥
या तिघांचे समाधान । अनुभव सिद्ध वैराग्य ज्ञान ।
हे नसता अनुभव पुर्ण । त्याने वैराग्य करावे ॥९॥
त्याणि माया सोडावि । लोकाचि तंन्हि लाज धरावि ।
भक्तपणाचि मज पदवि । असोनि हे क्रिया ॥१०॥
जेथे चालेल तप । तेथिल्या जागा गुप्तरूप ।
घेउनि अवघ्याणचा निरोप । स्वार व्हावे तपासि ॥के१॥
जनाचि लाज पाहु नये । नांव रूपाकडं होऊ नये ।
थोर अद्यातही मानु नये । प्रसंग जो दिसता ॥१२॥
जग मिथ्या माया जाणसि । त्याचे गोष्टिला मानतोसि ।
शास्त्र, नाहि ज्या पुरुषासि । तो पशुहुनि हीन ॥१३॥

शास्त्री आज्ञा कर्माची । दुसरि आज्ञा वैराग्याचि ।
तिसरि आज्ञा ज्ञानाचि । ते कृपेविण होयीना ॥१४॥
हे अवघेच सोडून । जिविका दुकान बांधोन ।
तानमान बोलोन । समयो रक्षिति पोटाचा ॥१५॥
आशा काहि सुटेना । तोवरि मन हेहि विटेना ।
थोरीव आवडेना । बसेना जनांत ॥१६॥
जनास देखुन कापावे । कार्याकारण हिंडावे ।
मूळ त्याणे असावे । आपुल्या स्मरणांत ॥१७॥
ज्ञानासाटि वैरागि । तोचि संन्यासि, तोचि योगी ।
रंगलिया आत्मरंगि । सिद्धांतपदि पावेल ॥१८॥
प्रपंचि मिथ्या वार्ता । तथापि याचा कोण कर्ता ।
त्याचि वदे पुराणि वार्ता । अद्यापहि देखति ॥१९॥
येक जाले ते अैकावे । तितुकेच कीर्तिस गावे ।
पुराणि वाखाणावे । जे जे जाले जे समयी ॥२०॥
तो भगवान समर्थ । ज्याच्या स्मरणे चुके अनर्थ ।
काया वाचा मने यथार्थ । त्याचि चरित्रे नित्य नवि ॥२१॥
म्यां कोठपर्यंत सांगावे । तुम्हि थोरा सिद्धास पुसावे ।
प्रपंच धन वैभव त्यागावे । किंवा भोगावे यथेष्ट ॥२२॥
प्रपंच त्याग अनुभवाने । ममता त्याग वैराग्याने ।
जग त्याग अनुतापाने । समाधाने त्याग अहंतेसि ॥२३॥
मुख घ्यावे लक्षाने । अनुभव तो वैराग्य ज्ञान ।
जरि करिसि विषय चिंतन । तरि जन्मांतरि दाखवील ॥२४॥
उर्मि काहि नसावि । गोष्टि कोणती तेहि न करावि ।
आलि वार्ता त्यागावि । काहि अैकणे नावडे ॥२५॥
तुझी बुद्धि येथे अैकणार । कि अैकता हे व्रत करणार ।
तरि श्री येकनाथ होणार । कराल निश्चय जो जैसा ॥२६॥
आधि आसन घालावे । मग सांगा स्वामि म्हणावे ।
ध्यानि स्मरोनि लक्षावे । श्रीराम कृष्णा ॥२७॥

चालोद्यावे निरोपण । धडधडीत वैराग्य आसन ।
जे जे निघेल साधन । ते ते अभ्यासेवीण कळेल ॥२८॥
अर्थ स्वार्थावरी घ्यावा । घेउनि मनि चिंतावा ।
तो योग चालि लावावा । जो बाणे समाधान ॥२९॥
समाधाने असता । विरे कल्पनिक चिंता ।
यात तुज अगत्यता । सुखे करुनि घेयिजे ॥३०॥
दर्शनेविण वैराग्य । होईना सांगोपांग ।
घालुनि आसन चांग । मनोजयो करावा ॥३१॥
नाना तीर्थे हिंडावे । पुण्यग्रामि वास्तव्य करावे ।
आधि आपुलें कार्य साधावे । मग लावावे दंडकि जनासि ॥३२॥
आपण होऊनि कोष्टि आला । तो दंडकि भाक्तिच्या लाविला ।
नामस्मरणाच्या पायिऱ्यावरि घातला । तेथे चढे वैराग्ये ॥३३॥
हे सांगणे आप आपणासि । ग्रंथ आवडि आहे जयासि ।
वैराग्य त्या बाणायासि । नलगे काहि साधन ॥३४॥
त्याने विश्वासे वाचावें । शरीर पुष्पांजुळि घ्यावे ।
नरदेहि आल्याचे व्हावे । पुष्पांजुळिचे पुष्प हो ॥३५॥
आधि आधार दर्शनाचा । मग धडधडाल्ट तपाचा ।
तोचि ज्ञान वैराग्याचा । घडे लाभु ॥३६॥
संसारिकासहि असावे । नेमीले शास्त्रि विषय भोगावे ।
आपुले स्वधर्म नेमि चालावे । त्याचा संग प्रपंच परमार्थ ॥३७॥
आधि आहार थोडा । दृढ आसन त्यास जोडा ।
वैराग्याने कडा चढा । सोहं हंसा गर्जोनि ॥३८॥
रंक हीन दीन । करुणापर गावोन ।
क्षण येक रूसोन । गावे आपुले आवडि ॥३९॥
गाता गाता येईना । घालि उपासि आसना ।
जीव बहुकां कडदरेना । न उठावे तेथुनि ॥४०॥
निर्मळ येकांत आसन । उत्तम भूमि पाहोन ।
जेथे नये दुजे चिंतन । येका देवाविणे ॥४१॥

ते स्छळ नेमावे । चिरकाळ दृढ लक्षावे ।
मौने गुप्त असावे ; जपामाजि ॥४२॥
थोडासा बाहेर आला । मागतित पळाला ।
तेथे चिंतुन थिरावला । आपुला जो आठउ ॥४३॥
कोणासि काशा गुंतेना । नैश्वर काहिही आवडेना ।
माना अपमाना भीईना । तो जाणा वैरागि ॥४४॥
वैराग्य यावयासाटि । तप करावे अति नेहटि ।
होईल दिगंबर भेटि । सहज करणे ते वैराग्य ॥४५॥
सावधान व्हावे । तुवा मनाचे नायकावे ।
पोथीतील अैकावे । श्री येकनाथ आज्ञा मानोनि ॥४६॥
येथें त्याग मनाचा । जो दृष्ट संग जनाचा ।
असिला तरि सत्त्वाचा । संग धरूनि राहवे ॥४७॥
तोवरि येकांतिच असावे । फार संभाषण नसावे ।
प्रीति विषयी त्यागावे । विवेके जाणोनि ॥४८॥
विषय ज्यास आटोपेना । तो साधु संगि राहीना ।
जाला तरि का सांगेना । का सुखे विप्रासि ॥४९॥
प्रायश्चित्त होयील । निंदक मुखे पाप जायील ।
अथवा ब्राह्मण कृपा करतील । तीर्थ देउनि शुद्धता ॥५०॥
तीर्थ अपवित्राचे पवित्र झाले : तथापि पवित्र तीर्थि भेटले ।
साधक ते सिद्ध जाले । तीर्थ प्रसाद पावता ॥५१॥
त्या तीर्थराजास नमन । आपुले प्रकृतीस का टाळुन ।
हे राहेल उदासीन । हेतपूर्वक स्मराहो ॥५२॥
प्रालब्ध कठिण यास्तव । न चले आपुलापण ।
विषय बळाचे धारिष्ट पूर्ण । होते त्याचे चिंतिले ॥५३॥
हा विषय बळकट । यासि जिंकणे ते मनास कष्ट ।
यास्तव धीर धरूनि वरिष्ट । त्याग अवघा पदार्थु ॥५४॥
जरि ज्ञानसिद्धि करणे । त्याग आधि नेमुन देणे ।
शरीर वासना खांडोन । आहार नेम थोडासा ॥५५॥

ज्ञान आता होयील । जतनायीस वैराग्य समुळ ।
तेचि आचरावे प्रबळ । त्यागावा अवघा दुःख संगु ॥५६॥
आपला संसार करावा । काहि येक नेम राहावा ।
उसनेपणे असावा । पर उपकारि म्हणोनिया ॥५७॥
तो परोपकार करीना । उदरार्थ फार शाहाणा ।
लोकिक मिरवणा । तो नव्हे या देशिचा ॥५८॥
ज्यास नाहि येथील जिव्हाळा । गोष्टिचा मानि कंटाळा ।
अैसि दुखासनि चांडांळा । चर्चाहि ते नको करू ॥५९॥
तथापि आवडिने करिसि । त्याच्या मना विटविसी ।
अथवा तुज तर्‍हि आपभ्रंशि । घालू शके ॥६०॥
कार्यार्थु त्यांसि जितुका । कारभार मात्र तितुका ।
तयाचि भगवान सुटका । कर्ता अैसे जाणावे ॥६१॥
प्रपंचियाणि भक्ति करावि । परमार्थियाणि आरण्ये सेवावि ।
ज्ञानियानि पाहावि । बैसले जागां हें कौतुकें ॥६२॥
वैराग्य यितुकें सांगितले । हे काय गोष्टिवारि गेले ।
तुझे तो मन राहिले । विषयांत ॥६३॥
आतां तर्‍हि पुसावे । मनि हीत काही विचारावे ।
आयुष्य सरतां मरावे । लागे कि न लगे ॥६४॥
त्या मरण भयासी । वागवीत नाही मनासीं ।
अैसी या मुर्खासि । मौन्य मुद्रा धरावि ॥६५॥
पुन्हा जन्मांतर भोगणे । तरिच संसार हव्यास धरणे ।
वाराणसि यात्रा तर्‍हि करणे । जन्मांतरि मुक्त होय ॥६६॥
स्वधर्मि आणि भक्तराज । देवा ब्राह्मणाचे करि काज ।
ज्याच्या आंगि गुण सहज । तो योगि जाणावा ॥६७॥
कोण्हि म्हणति दर्शन । कलिमाजि नाहि होणे ।
विषय तल्लिन जाले मन । तरि दर्शन नाहिरे ॥६८॥
सोपे वैराग्य सुखवासि । जाणे न लगें देशांतरासि ।
गावि राहुनि जागत जासि । पुष्पांजुळित मन घालि ॥६९॥

पक्वान्न सेउनि निर्विषय व्हाया । वेव्हारि अभेद असावा ।
निराभिमाने थाटावा । जो आंगिकारिला प्रपंच ॥७०॥
साधुसि पुसत जावे । त्याचे सन्निध राहावे ।
वेदांत श्रवण करावे । मिथ्या प्रपंच भासतो ॥७१॥
बळे चित्त दुखवावे । सारासार विचारावे ।
निंद्य क्षणक्षणा दिसावे । शास्त्र विरूद्ध होताचि ॥७२॥
मने कल्पिले । तेचि शरीरे केले ।
वासनेने आतळले । विटाळ नव्हे तो कैसा ॥७३॥
आहा जाते शरीर । करा याचा विचार ।
आहे मोटि मारामार । जन्ममृत्युचि ॥७४॥
वडिली संसार दाविला । तो छंद कैसा लागला ।
झोंबतो नैश्वर पदार्थाला । हात पाय झाडूनि ॥७५॥
शास्त्र वडील सर्वांसि । हे चालणे वडिलासि ।
तेच बुद्धि लेकुरासि । वृद्धाचार चालवीती ॥७६॥
उत्पन्न ज्ञानी वैराग्ये । निघे झडझडोनि आगे ।
येंउनि प्रकृतिवरि रागें । आरण्यात तपासी जातात ॥७७॥
त्याला विचार न लगे करणे । शास्त्रार्थिच येके सत्य धरणे ।
मग संत बरवा धुंडणे । सेवा करणे ज्ञान अभ्यासा ॥७८॥
ज्ञान कासिया म्हणावे । नायिकिले ते ठावे व्हावे ।
मि सर्वत्र भासावे । जेवि आपुले शरीर ॥७९॥
मान च(?) यात घालाना । चित्तातुनि लालुच सुटेना ।
योस्तव (?) भाव उमटेना । वैराग्य वैभव ॥८०॥
संसारिचि गोष्टि सांगु नये । सिद्धि हे गोसावियांहि मिरऊ नये ।
धातुवादि लाऊ नये । भोळिया पुरुषासि ॥८१॥
पूर्विल रूणान बंधाला । देव तोहि शतकोटि लिला ।
रावणाचे हाति पडीला । सवेचि मारिला रावणा ॥८२॥
कृष्णे विंधुन घेतले । कावेकाट्यास सोडिले ।
द्वारकेत दुःख प्रबळले । वधिले छपन्न कोटि यादवासि ॥८३॥

पांडवासि वनवास । दुःख कैसे नळास ।
येव्हढा पाहा दशरथास । पुत्रशोक न चुकावा ॥८४॥
पूर्विल नेमणूक चुकेना । आता करि बहुत कल्पना ।
दिल्ह्याविण पावेना । सर्वोत्तम सखा जो ॥८५॥
ये जन्मि द्यावें । पुढे कोणे पावावे ।
अरे ते घेता देतां दिसावे । क्रिया आंगिचि ॥८६॥
कोंण्हि येक घरेचि लुटिति । सर्वस्व दान अर्पिति ।
समर्थ त्याचे घर भरिति । उदारदाता जाणोनि ॥८७॥
समर्थ असतां दानाला । करंटा असोनि तपाला ।
आळसुनि निसुर बैसला । तरि ते दोघे अधम ॥८८॥
करंटिया वैराग्यं येयीना । त्यापुढे कोणते दंडीना ।
संसारसि त्रासेना । चुकुरपण जंन्हि ॥८९॥
तैसिच समर्थासि । ब्राह्मण येतां समयासि ।
त्याजवरि वाटारि नयनासि । जेंवि हरणावरि श्वान ॥९०॥
त्यास पात्रापात्र उमजेना । आंधळा आणि आदरवणा ।
त्या दोघां झडकरी त्यागाना । पापी अन्यायी म्हणउनि ॥९१॥
आता आंम्हि काय सांगावे । पुरवेल तुला ते करावे ।
आता क्षणभरा मरावे । लागे सर्वांसि ॥९२॥
मरणे हे दूर आहे । कधि होयील कोण पाहे ।
आताचे सुख लवलाहे । आले ते सोडू का ॥९३॥
अैसा अद्यापि विटेना । करीन वैराग्य हे स्मरेना ।
तो सोयरा सखा समजेना । तारक प्रपंच परमार्थी ॥९४॥
अद्यापि जे आचरते । ते सर्वा गोष्टिचे पुरते ।
देवे केले सरते । त्याचा भवानुसार ॥९५॥
तु म्हणसि प्रालब्धा आधिन । जाले शरीरास वर्तण ।
त्याचा घाता अघाता लागुन । कोण करी संरक्षण ॥९६॥
जेव्हा देवास शरण आला । तो प्राक्तनाचा पहिला भला ।
तरिच सत्त्वगुण वाढला । दुर्वासन त्यागुनि ॥९७॥

व्यसनहि सुटेना । भजनि आवडि बैसेना ।
सखा स्वामि होईना । भक्ति वैराग्यविण ॥९८॥
इछा नाहि भक्ति करीतो । ज्ञानासाटि तप ईछीतो ।
संसार भय मानितो । स्वप्नी मिथ्या वेव्हार ॥९९॥
चित्ता नेमनेम वासनेसि । मन सुमन पुष्पांजुळिसि ।
अर्पण करी गुरु चरणासि । सर्गक्षि माझ्या चित्ताचा ॥१००॥
जरि हीत करणे । त्याग करा कोटि गुणे ।
लालुचि गुंति उगवणे । तरि सुख पावाल ॥१॥
आधि भक्ति करणे । हेचि तो बहु कठिण ।
वैराग्य तो दारूण । होणे कृपा तुमचि जि ॥२॥
मि सांगता राहिना । तुम्हि तरिकां अैकाना ।
थुंकुनि जी टाकाना । मायीक विषयी ॥३॥
आजि वैराग्य जोवरि न ये तोवरिच विषय अपाय ।
विषय सुटता होय । ज्ञानरूप स्वप्रकांश ॥४॥
स्वामि आता करीन । जळो माझे मोटेपण ।
इतुकि मर्यादा धरून । किति प्रकारे समजावा ॥५॥
तरि निशंक मज दंडावे । रिहिणि येके लावावे ।
भिडेने पोषवावे । माझी दुर्बुद्धि कल्पना ॥६॥
हे मन नाहि माझे हाति । किति येक कल्पने भाविति ।
चिंतु नये मागुति । शरीर सुखासाटि ॥७॥
आता हे जिकडे जायील । तिकडे वैराग्य करिल ।
तरि कल्पनाहि मरेल । वैराग्य अग्नि करूनि ॥८॥
वैराग्ये तप जाले । ते चमत्कारी बाणले ।
दिषय सुख रागेले । तरि विलंबे फळश्रुता ॥९॥
विट मानाल बोलाचा । शब्द नव्हेल फुकाचा ।
नरहरीदास जयाचा । त्याचि उत्तरे साजुका ॥१०॥
कोण्हा उपेगा येयील । भावार्थि आताच झोंबेल ।
त्याचा तरुणोपाय होयील । यास्तव बोलिलेच बोलिजे ॥११॥

जननि जठरि भर्गवास । तेथे नरकासा रहिवास ।
होता सोहं हंसध्यास । यास्तव ज्ञान तयासि ॥१२॥
ते वेळे जन्मांतर आठवते । वैराग्य युक्त जाणवते ।
येथुनि सहसा प्रपंचाते । न करी हो नारायणा ॥१३॥
जठरि ज्ञान काशाने । दुःखे देवा स्मरोन ।
पुढेहि हेच आचरण । भजन पीयूषे वाचला ॥१४॥
तेचि करिसील तु ध्यास । बाळा अैसा कासाविस ।
तो मि मी तो परमहंस । हंसेश्वरी वाहावि ॥१५॥
हे परमहंसाचि कळा । येथे जीव शिवासि मेळा ।
कोटि जपे वेल्हाळा । सिद्ध होतो साक्षिभूत ॥१६॥
चिंतिले जागा तेणे जावे । बाळ अैसे जाणावे ।
आंगि सुखहि बाणावे । वैराग्य ध्यान केलिया ॥१७॥
तुज विषय घाबिरे करिति । नसता संदेह वाढविति ।
तरि स्वामिस होऊनि काकुळति । सुटिका विचार पुसावा ॥१८॥
त्याचा कठोर उतरासि । जरि पुष्पांजुळि मानिसि ।
तरि तुझ्या येशासि । मेरूहि बा तुकेना ॥१९॥
कोणि तन्हि राग केला । तो क्रोधाचा गुण उमटला ।
अन्याई न म्हणावे रोग्याला । दुःखोभ्दवा कष्टि तो ॥२०॥
काम आंगि धावोन । जरि लागले स्त्री ध्यान ।
विवेके आसन घालुन । पुष्पांजुळि पाहावि ॥२१॥
आधि विषयाचे रान । ते हे स्त्री संभाषण ।
जिव्हे मिष्ठान्न पाळुन । वेडे केले साधका ॥२२॥
हे ज्याचे त्यास कळेना । संत संगिकारे राहाना ।
चुकले गोष्टिचा कैवार घेयीना । स्वमुखेचा हाड आपणचि ॥२३॥
आजि म्या अैसे केले । पाप मुखे उच्चारिले ।
लोकि मिळोनि प्रायश्चित दिल्हे । जाणे तेणे श्रुचि हो ॥२४॥
हे तुज करवेना । तरि अति अन्यायी का म्हणविना ।
तुटायाचे उपायि का लागेसिना । तरि सुटिका केउति ॥२५॥

आता जो अैकु बैसलासि । निश्चयो मग करूनि जासि ।
तरिच गुरु पुत्र होसि । नाहि तरि बहुभाष्य ॥२६॥
वैराग्य काशाने येते । भावे जे श्रवण करीते ।
तपाचेंहि अधिकारी होते । स्मरणि कथा ठेविल ॥२७॥
रात्रि निजुनि राहिना । कोवसा कोण्हि दिसेना ।
केल्याविण राहिना । प्रपंचीक परमार्थी ॥२८॥
सावडे भाविक वचनोक्ति । न बोलवे युक्ति प्रयुक्ति ।
म्हणे अवघी कर्त्ताश । सत्ताक्ति होणे स्वामीच्या ॥२९॥
कोठपर्यंत सांगावे । अैकिल्या सारिखे आचरावे ।
हे करिता दुःख व्हावे । अैसा कोण्हि नाहि रे ॥३०॥
या तपाने संत जाले । अवचटे ज्ञान लाभले ।
थोर नामांकित अैकिले । दर्शनेविण हो ॥३१॥
दर्शने सिद्धि ज्या जालि । ते मूर्तिमंत कृपा आलि ।
त्या देवाचि सायुज्यता फावलि । त्याचाच ध्यास म्हणोनि ॥३२॥
आतांहि वैराग्य येऊन । कंठि नामाचा उच्चार करणे ।
होसि संता समान । ज्याचि किर्ती तिहि लोकि ॥३३॥
संसार भय निवारेल । इछाहि प्राप्त होयील ।
जे जे समयि काहि मागल । ते ते होयील प्राप्त हो ॥३४॥
अवघा पदार्थ ज्या पासि । तो देवचि सखा आपणासि ।
न मागता सिद्धि त्यापासि । आपण होउनि राहाणार ॥३५॥
जाला विश्वास देवाचा । कर्तासखा सर्वांचा ।
तो कैसेनि आमुचा । हातास चढेल ॥३६॥
त्यासि मनोगत पाहाणे । हा कैसा आहे शरण ।
मग करो त्याचे पाळण । मनोभाव जाणोनि ॥३७॥
स्वामि आता माझे मजपासि । आचराया बुद्धि साह्य होसि ।
तरि इतुका ग्रंथ हितासि । आम्हासाटि वदलेति ॥३८॥
जरि आधि आचरुंना । तरि सुखा सहसा देखुना ।
आताचि तो हे भावना । पुढिल कल्पना तुम्हि दे ते ॥३९॥

चित्ति खेद वाटला । आहा प्रेमा का नाहि मजला ।
धरि धरि आवडिला । प्रेम पान्हा फुटेल ॥४०॥
वैराग्य करिता त्रासु नये । उपासि असता रूसु नये ।
घाबिरे पोटास होउं नये । क्रिया आपुलि देयील ॥४१॥
देवाच्या दर्शनाला । आधि धरि भाव भोळा ।
वैराग्य विवेक त्याला । सहज ज्ञान प्रकाशु ॥४२॥
कथा हेचि ग्रंथांत । आचरायाचि आज्ञा करीत ।
याचि थोर फलश्रुत । ब्रह्मादिका दुर्लभ ॥४३॥
विषय शास्त्र विरूद्धिचि । ते सांग रोधायाचि ।
आवडि धरूनि भजनाचि । नित्य नेमे राहारे ॥४४॥
जरि मन तुझे अैकेना । निरोपण हृदयी संचरेना ।
भावार्थे कारे पाहाना । पुष्पांजुळि शब्द सुमने ॥४५॥
वैराग्य करावया कारणे । मानाभिमान लज्या जाण ।
काम क्रोध मद मछरा लागुन । दवडावे शरिरीचे ॥४६॥
तप करीता रागा येतो । रागावारि पुण्य देतो ।
अभिमान विशष जडतो । आम्हि येक तपस्वी ॥४७॥
राग द्वेषाचे मुंडण । घरचे घरि जालि खंडण ।
तरि देह व्यर्थ दंडण । काशासाटि करावे ॥४८॥
विवेक मन अैकेना । विषय यासि सुटेना ।
झडझडोनि वेगळा दिसेना । मि साक्षि सर्वांचा ॥४९॥
सोपे कर्म आवडेना । मग वैराग्ये केला किविलवाणा ।
सोडोनि मानाभिमाना । सर्वत्र अभेद पाहाणें ॥५०॥
ज्ञानेश्वरी भागवति । हे ग्रंथि सोलिव वदंति ।
बहु विस्तरे कृपा करिति । ज्ञानदेव येकनाथ ॥५१॥
तो तुम्ही ग्रंथ शोधूनि पाहावा । साधुमुखे ऐकावा ।
नामाचा पाट लावावा । देयील वैराग्य दत्तात्रय ॥५२॥
कथा रानि करावि । येकलाच देवा रंजवि ।
दुसऱ्या देखुनि दडवि । आले प्रेम ॥५३॥

लोकांत येखादा होईल । श्री स्वामि कोपतिल ।
पुन्हा स्वामि प्रेम न देतील । यास्तव मौन्य बसला ॥५४॥
हिशोब जैसा... । आधिक उणा हो न खाताचा ।
तो शोधि जागा चुकीचा । ज्याचा काही संशय ॥५५॥
तेहे चुकि मनाचे खाति । कोणे मननि राहाति ।
गोष्टि तरि अैकति । ते राहाति जेथिचा तेथे ॥५६॥
दंडकि नाहि ज्यासि भंजन । नाहि साधुसंताचे दर्शन ।
कुग्रामि वास्तव्य करून । वेडा अैसा भ्रमिस्त ॥५७॥
त्यासि संग श्रुद्राचा । जेथे नाश जाला मतिचा ।
अभिमान सुटोनि जातीचा । परधर्म वर्ततो ॥५८॥
त्यासि अक्वटे उत्तम ग्रंथे । अज्ञान तुटे ।
जरि श्रवणाचे चपेटे । करील वरिच्या वरि हो ॥५९॥
त्याचे अज्ञान तुटेल । सांगीतला योग करील ।
केवळ मुर्ख राहिल । हे गे ते गे करीतांचि ॥६०॥
आणिकहि येक विस्मयो जाला । जरि अैकुनि उगाचि राहिला ।
नाहि वैराग्ये हडबडीला । तो नष्ट यातिचा ॥६१॥
सार सांगता येईना । आपुल्या विषयी चिंतना ।
न करी जो हरि स्मरणा । तोहि दुष्ट दुरात्मा ॥६२॥
शास्त्र अवगत अवघे आहे । राहाटि तैसि तया नोहे ।
भावार्थे व्हावे साह्य । तो ज्ञानाभिमान आवडिल ॥६३॥
ज्ञानाभिमान गेला । आणि सुखवासि जाला ।
वैराग्य नाहि त्याला । तो उपेगा येयीना ॥६४॥
येथुनि सावधान जाला । वृत्तांत वृत्तीचा कथीला ।
विश्वासे गळा बांधिला । भजन मार्गि देवाचा ॥६५॥
येथुनि श्रोता जाला सावध । विचारिलि भजन विधा ।
शास्त्रि ज्याचा निशेध । तो तो न पाहावा ॥६६॥
कोणता विषय तुटतो । कोणता अग्रह घेतो ।
जो रात्रि दिवस जाचितो । त्याचे पाठि लागावे ॥६७॥

पाठि लागलिया विषयाचे । बाण सोडि विवेकाचे ।
कवच आंगि बोधाचे । पाठि सैन्य गुरु आज्ञा ॥६८॥
बळ जाले गुरु आज्ञेचे । तेथे न चाले काळाचे ।
थाचे तप निष्ठेचे । भगवान चिंतनि ॥६९॥
जो जो वेव्हार जाला । गुरु आज्ञा म्हणे त्याला ।
पाऊल भिऊव टाकु लागला । नित्य श्रवणाचे बळे ॥७०॥
उर्मि जेव्हा उठिलि । पोथि जवळ घेतलि ।
तेथे आशंका पळालि । मग वेव्हार सुखाचा ॥७१॥
येथेहि विषय अैकेना । तरि करावे शिवदर्शना ।
पापी मि अंगगुणा । त्राहे हे शिवशंकरा ॥७२॥
अवगुण वाटु लागले । ते विषय त्याचे तेव्हा गेले ।
दुःसमागमे उठिले । ते नित्यानित्य उठवि ॥७३॥
सत्यबोध जाला त्यासि । म्हणोनि गुंतला देवासि ।
दुर्जन जाणोनि विषयांसि । त्याग भारि वाटेना ॥७४॥
सत्त्वगुण प्रगटला । आनंदभरित जाला ।
तृणा प्रमाण विषयाला । मिथ्या मायिक जाणती ॥७५॥
याहिवरि काहि आवडेना । परमार्थ सहसा सोडिना ।
जनास कळो देईना । अनुभव यावा तो पर्यंत ॥७६॥
येकांति आसन घालीन । ब्राह्म मूहूर्त साधीन ।
आसन जय करीन । वैराग्य बळे ॥७७॥
हे हि मन करू देईना । लालच त्यास दाखविना ।
आसन घालीता आरोग्यवाणा । तुचि होसि ॥७८॥
मग त्वाहि आसन घातले । त्याच्या चमत्कारि आले ।
क्षणहि जरि लयस्त जाले । तो न सुटे ध्यास जन्मावरी ॥७९॥
श्रोता तल्लिन जाला । भावार्थ तेथे आला ।
अवगुण पळाला । होय न होय होति जे ॥८०॥
तेव्हा सन्मुख बैसविला । कृपे करूनि अवलोकिला ।
अर्धोन्मिळित राहिला । सत्रावि सेउनि ॥८१॥

तेथे वृत्ति तटस्त जाली । मि तुं पणाचि ठाणिं उठिलि ।
ब्रह्मनंदे जालि । तन्मयता ॥८२॥
अैसि वृत्ति जालियावरि विवेकसिंधु श्रवण करि ।
बहुत करुनि खेचरि । अखंडता बाणावि ॥८३॥
या सुखासाटि । रिघति गिरी कपाटि ।
ते सुख प्रत्यक्ष दृष्टी । अवलोकन मात्रे दे तुझे ॥८४॥
सद्‌गुरूचा उपकारिला । सहज संतोष बाणे त्याला ।
सेवेतचि सांग असिला । ते सुख अपारकि ॥८५॥
नरहरि सेवा अखंडित । हृदये नवरत्ना पदक जडित ।
संत भजन भक्तिने तृप्त । पुष्पांजुळि वर्षताती ॥८६॥
इति श्री पुष्पांजुळि ग्रंथ त्रितियोध्याय. ३

अध्याय ४ था

श्री मद्‌गुरूदत्त वरदाये नमः ।
वों नमो श्री अवधुता । तुझा तुं अवघा वक्ता ।
तेथें कृपा करावि म्हणता । लाज वाटे ॥१॥
तुज सर्व रक्षणे । बरे वाईट सांभाळणे ।
तेथे ग्रंथीच मति मागणे । आहे जे मति ते कोणाचि ॥२॥
जितुके कळले पण । हा सामर्थ्ये माया भगवान ।
येथे वरि भुलि घालुन । आपुलेपणे लोपला ॥३॥
येकला येकट भगवान । दुजे नाहि त्याजविण ।
हे उमजावयास खुण । करावा कोण उद्वेष ॥४॥
ज्ञानास उद्देश । जाणणे मात्र हंस ।
तेथे स्छिरावलिया परमहंस । सत्ता नायिक दिसावा ॥५॥
आशा अवधि सुटोनि गेलि । अहंता लाजेचि जिरालि ।
मि तुंपणाचि जालि । बोहरि येथुनि ॥६॥
जेथे मिच ज्यास कळेना । तुं पणाचा देखणा ।
दोहिंचा आठव नाठवणा । सत्ता हे दिगंबरि ॥७॥

मज काहि उमजेना । तरि नुमज का राहिना ।
संतोष हा पाहुणा । राहो जन्मवरि ॥८॥
हृदयी थोकुन राहातो । विस्मयावाणि बैसतो ।
काहिच ना।हिसा होतो । न जाले विण ॥९॥
निस्पृही आणि घाला । जनि असोनि निराळा ।
ज्ञानिया असताहि भोळा । नेणे पै श्रुन्य ॥१०॥
सर्वास जयाचि आवडि । ब्रह्मनंदे तृप्ति गोडि ।
संतजनाचि प्रताप प्रौढि । कथेमाजि गातात ॥११॥
तोवरि शरिरासि भावना । ये उठोने दि कल्पना ।
सहज योगे मनोवासना । त्यागेंच ज्याचि ॥१२॥
स्त्रि पासुनि चित्त बिटते । ते काहि केल्या न जडते ।
तेथे लटिके कार्यापुरतें । करणें लागे कार्यभागु ॥१३॥
तेवि शरीर प्रालब्धाधीन । त्याचे कर्तें भोक्ते हे भिन्न ।
आपण अवघा पूर्ण । स्फुरण मात्र ॥१४॥
अजाणाचा जाणता । जाणतियाचा नेणता ।
उदार दयाळ प्रतिपाळिता । कृपाकर्ता दिनबंधु ॥१५॥
ज्ञानियास जग सज्ञान । आत्मा अनुभव हा पूर्ण ।
मि येक निजोन । जागा जैसा ॥१६॥
जागा होतो अटव्यात । तो जैसा वस्ति पाहात ।
तेवि ज्ञानिया शोधित । उत्तम भुमि वास्तव्या ॥१७॥
अभेद जेथे पाहाणे । तेचि उत्तमत्त्व जाणणे ।
आनंदानंद बाणणे । त्याची सत्ता ॥१८॥
प्रियकर अवघ्याचा । सत्ता नायीक सर्वांचा ।
निराभिमान काया मने वाचा । मिया सर्वासि द्रष्टा ॥१९॥
स्थिर बुद्धि सुख संतोषि । कोण्हि नसे ज्या पारखी ।
आप आपणातच सुखी । गदगदा हासत ॥२०॥
आपुली भावना बोलतो । अनुभव स्वामिचा सांगतो ।
ज्ञानिया ठकावतो । मुक्यांच लक्ष जयाचे ॥२१॥

डोळा आंगे आवघा । येकाच मि भाव जगा ।
पाहाणे नाहि कुसंगा । वैराग्य वृत्ति ॥२२॥
शांति दया कृपा देखिली । पुरे आणि परीक्षा निराळी ।
प्रेमा सग्ददीत बाष्पे दाटलि । तरि ज्ञानिया तो ॥२३॥
काहिहि करणे न करणे । हे प्रालब्धा आधिन ।
सत्ता नायीक समाधान । साक्ष मात्र होतसे ॥२४॥
रागि रंगि तानमानि । भुले कोण्हि अनुसंधानि ।
ज्ञानियाचि तैसि पाहाणि । सर्व रागरंग तानमानाला ॥२५॥
मृदांगा सरिसे वारे । घुमघुमी जेवि जुभारे ।
विठल किन किन हकारे । ककांरांत भेदवी ॥२६॥
बहुत करूनि वेडावतो । तिन्हि दशा भोगितो ।
कोटि गुणे त्यागितो । भोगित्या सिद्धि ॥२७॥
नावड जेव्हां देहाचा । मुळ अनुभव ज्ञानाचा ।
विसर शरीराचा । या नाव वैंराग्य ॥२८॥
आल्या सिद्धि त्यागाच्या । घ्या माझ्या प्रालब्धाच्या ।
शरीरास त्रासायाच्या । महत्सिद्धि मानितो ॥२९॥
विस्मीत वैसला । हांस हांसोनि रडु लागला ।
मतीचे गुह्य बोलो लागला । अंतर साक्षि आमुचेजी ॥३०॥
भरीत आकाशाचे । कोदोनि भरिले तेजाचे ।
नरहरी स्मरणाचे । पुष्पांजुळि ज्ञानिया ॥३१॥
ज्ञानियासि कैसे असावे । हे चिव्हावरूनि जाणावे ।
समाधानी वोळखावे । अंतर वाह्य सारिखा ॥३२॥
स्वस्त चित्ताचे चिंतन । तो हरीमय आवघा पण ।
हे जालेसे विवरण । साक्षभूत पणे वेगळा ॥३३॥
आपुले शरीरि जैसा । अवघेपणि अवघा तैसा ।
चाळक संर्वातरि सारिसा । तोचि होतसे ॥३४॥
संगा सारिखे व्हावे । त्याचे त्यापरि समजावे ।
आपणा सहीत भासावे । ब्रह्मांड हे ॥३५॥

अग्रह तो असेना । पुढिल मागिल स्मरेना ।
आहे तेच विवंचना । आपल्या आपणचि ॥३६॥
धैर्यवंत साक्षिवंत । कृपावंत दयावंत ।
सत्यवंत नीतिवंत । आत्मवंत आत्मा ॥३७॥
अभेद कोठे दिसेना । दुजा भेद उमजेना ।
जालो हे काहि उरेना । उर्मि मनाचि ॥३८॥
रात्रि दिवसाचा पाट । हा सारिखाचि तेजोलोट ।
आनंद उकळी उत्कंट । निलारंभि निरामय ॥३९॥
आकाशात वायो गेला । तैसा नाहिसा जाला ।
तो केव्हा कैसा जिराला । आप आपणांयांत ॥४०॥
चौ देहाचा साक्ष स्वरूप । तेचि आत्त्मयाचे रूप ।
आकाश गिळोनि अमूप । अवकाश जाले ॥४१॥
घनदाट निर्मळ अरिसा । अंतर्बाह्य लोट सरिसा ।
स्मरण उठे तो ठसा । दृष्टिपुढे दिसावा ॥४२॥
उदास वर्तने रानि हिंडणे । आलो येथे कोठे जाणे ।
हे नाहि ज्ञात्यासि भान । सर्वत्रता बाणलि ॥४३॥
विशेष काहि बोलावे । तरी भागवत ग्रंथास पाहावे ।
ज्ञानेश्वरीस अवलोकावे । सविस्तर आहे विस्तार ॥४४॥
तेथील पारायणे करावि । संतमुखे विवरावि ।
तत्त्व ज्ञाडियासि पाहावि । हा विस्तार मायेचा ॥४५॥
मन उन्मन जाले । शरीर स्वभाव विसरले ।
फळ प्राप्तीस अर्पिले । सुमन जैसे ॥४६॥
शरीर मि बोटेना । मि तो जालो अवघा जाणा ।
कल्पना काहि स्फुरेना । सर्वगत पणे ॥४७॥
ज्ञानियासि काय म्हणावे । तिहि स्वच्छंदे वर्तावे ।
अवघेचि व्हावे । मि मि तो तुचिजि ॥४८॥
ब्रह्म तिहि जाणितिले । सबरा भरित देखिले ।
संतोषाने केले पारणे । पारणे जेथे ॥४९॥

पाणियांत जो राहिला । तो बुडाला अथवा सुसरीने नेला ।
त्याच्या वर्तमानाला । जाणे काय बाहेरिल ॥५०॥
मुख्य तो लेकुरासारिखा । अथवा उन्मत हरिखा ।
पिशाच्यपणे मारि हाका । तो उत्तम जाणे कोणे ॥५१॥
श्रुद्ध स्फटिक निर्मळ । तो संगे दिसे बरळ ।
तेवि त्रिगुणात्मक मळ । जीव जाला संगाने ॥५२॥
संग त्या गमनाचा । दुसरा कोण्हि वैराग्याचा ।
हाति भाला विवेकाचा । आंत बाहिरा फिरवि ॥५३॥
येऊ देत नाहि तृप्तिला । आलि तिस देखे डोळा ।
पाहातो आपली आंतर कळा । सिद्धासनि होऊनि ॥५४॥
सिद्धासनि साक्षभूत । सोहं हंसा ध्यानि येकांत ।
नरहरि नेमे लोटत । येकनाथ चरणी पुष्पांजुळि ॥५५॥
इति श्री पुष्पांजुळि ग्रंथ चर्तुध्याय ॥

अध्याय ५ वा

श्री अनुसूयानंद नमः
वों नमो अवधूता । माझि तुज सर्व चिंता ।
गुणवर्या अनंता । उपमा काय मि वाणु ॥१॥
तरि आत्तां उदास न व्हावे । धाउनि सखया लौकर यावे ।
बाहीन मि अैसे न पाहावे । वाट माझि ॥२॥
होते तुजला उद्धार करणे । म्हणउनि दिल्हे तुवां स्मरण ।
जरी तुवा निष्ठुरपण । धरिता कोण सांभाळि ॥३॥
आजचा भार अभार । जन्मांतरिचा सखा साचार ।
कळतो हा निर्धार । तुझे नाम स्मरति जे ॥४॥
जगांत अैसे जाले । तुझा दास मि हे नेमिले ।
आतां आमुचे विचारिले । तो तु स्वामि सर्व हो ॥५॥
इछेसि काही कळेना । नैश्वर्य पदार्थासि विटेना ।
काय करावे रघुनंदना । तु शिरि असतां अवधूता ॥६॥

धावोनि येकदा यावे । सख्या दर्शन मज द्यावे ।
अन्यायि तऱ्हि न त्यागावे । दयावंत म्हणोनि ॥८॥
दया लवकर येऊ द्यावि । पुष्पांजुळित भेटी व्हावी ।
साधका सिद्धास मानावि । चमत्कारे ग्रंथ वाचिता ॥९॥
वाचावया श्रोते बैसति । रामकृष्ण नामे गर्जति ।
दत्त अवधूत प्रगट होति । भावार्थ देखुनि तुमचा ॥१०॥
देव्हेयाचे उत्तरास । द्यावया जाला व्यास ।
वरद उत्तर विशेष । वाचितां पावति कामना ॥११॥
जो जो ज्या कर्मात राहील । आणि पुष्पांजुळि स्मरेल ।
तो अर्थ विशेष लाभेल । आपुल्या उद्यिमाचा ॥१२॥
मज देवा कारणे । जितुकि तांतडि करणे ।
हें गेस्त्र जवळ पाहाणें । बोलावणे प्रिय करूनि ॥१३॥
अंतर वाणि देवाचि । तेचि प्रगट गोष्टि ग्रंथाचि ।
येकनाथि कृपेचि। सुमने त्यास आर्पिलि ॥१४॥
शब्द त्याचा आलोलिक । ग्रंथ वदे कवतुक ।
मज न वाटे मि होयक । श्री येकनाथ स्वामि दिसती ॥१५॥
दिसो अथवा न दिसो । अभिमान तुझा तुज असो ।
मि मज हाही भासो । आहेस जो पूर्विचा ॥१६॥
दिनानाथ नाथा दिन बंधु । पावे पावे कृपासिंधु ।
मज करावा ज्ञानप्रबोधु । अपुले सत्ते ॥१७॥
तुझे बोलणे वरद उत्तर । तो मि जपेन निरंतर ।
तो जप निर्धार । सांगावे येकनाथासि ॥१८॥
नाममंत्र हा रसायन । त्याचा उच्चार विशेष करणे ।
कोणते नाम नेमुन देणे । श्री गुरुदत्तात्रय हा जप जपे रे ॥१९॥
स्वास उस्वासी स्मरता । पावसी दत्तात्रय सायुज्यता ।
गुरुमुखे विचारिता। सिद्धार्थ पावसि ॥२०॥
दत्त दत्त स्मरणे । पातकाचे होय हरण ।
सखा तात्काळ येऊन । उभा दिसे भावार्थियां ॥२१॥

तो भावार्थहि येयीना । पुजा पुनस्कार कळेना ।
तन्हि दत्तात्रय स्वामि स्मरणा । साध्य होति नवजणी ॥२२॥
सत्त्वगुण प्रगटावा । वैरागी तो व्हावा ।
सर्वार्थ त्याचा पुरावा । आणि व्हावा दृढ दर्शना ॥२३॥
कोटि पर्यंत जपाचा । नेम शंभर लक्षाचा ।
तेव्हा तो दत्तात्रयाचा । होतो हृद्‌गत ॥२४॥
ध्यान सग्दुरू स्वामीचे । हेचि रुप दत्तात्रयाचे ।
चिंतिल्या मनाचे । उन्मन करि ॥२५॥
सखा दत्त चिंतावा । अनुसुया सुत अळवावा ।
येयीनासा तरीच वाटावा । नसता मूर्तिमंत येई लोकि ॥२६॥
अवघे अवतार दत्ताचे । रामकृष्ण फरशरामाचे ।
वामन नरहरि नारायणाचे । अवतार घेति दत्तात्रय ॥२७॥
दत्तात्रयाच्या चरित्रासि । वाचा काय काय वदसि ।
वेदहि नेति शब्देसि । स्तब्ध होऊनि राहिले ॥२८॥
मूळ देह तो मंत्राचा । उभा पूर्ण ब्रह्माचा ।
म्हणसि तो मंत्र कोणाचे मुखीचा । तिन्हि देवाचे हृद्‌गत ॥२९॥
त्यानि आपुलि जीवन कळा । उघड देखावया डोळा ।
अनुसुये अंर्जुळि । वोतिलि ब्रह्ममुस ॥३०॥
चिरंजीव चिरकाळिचि । कोणत्या त्रेता युगीचि ।
मूर्ति सख्या अवधूताचि । प्रगटे जगदोद्धारा ॥३१॥
सहस्त्रार्जुना भेटि दिल्हि । मागितलि वस्तुते अर्पिली ।
त्या मर्यादा मात्र सांगितलि । गायी ब्राह्मण स्त्रियाचि ॥३२॥
याचे वाटे न जाता । सुख संतोषे होय नांदता ।
यांसि दुःख देता । पावसि दुख विशेषे ॥३३॥
त्याने वचन उलंघिले । समुळि नगर युद्धि मारिले ।
भेटिने संचीत होते केले । जे विष्णु हस्ते निजधाम ॥३४॥
स्वामि तुज गोष्टि काढिता । जळोनि जाति आपुली हंता ।
तेथे गोष्टि भेटि लाभता । काय उणे त्या पुरुषासि ॥३५॥

दत्तात्रय स्वामिचे कवतुक । राजा पायदळ प्रजारंक ।
यातिचा निच आणि भाविक त्यास प्रसाद लाधतो ॥३६॥
दत्तस्मरण ज्याला । काय उणे असे त्याला ।
पाहुनि भाविक भोळा । इच्छिलि कामना पुरवि ॥३७॥
च्यान्हि मुक्ति अवघे देति । दत्त सायुज्य हे स्वये होति ।
गोष्टि पुससि येकांति । दत्तात्रय देव सर्वांचा ॥३८॥
भानवियात गुरुत्त्वपण । मिरवावया सामर्थ्यपूर्ण ।
त्यासि पाहिजे पूर्ण ज्ञान । तरिच येईल शोभेला ॥३९॥
हा तो गुरु सर्वांचा । देवा ब्राह्मण ऋषिचा ।
चौऱ्यासि सिद्धांचा । राजा रंकाचा गुरु वरिष्ठ ॥४०॥
गुरु पदाचि त्यासी सेवा । तो अभिमान पडेगा देवा ।
गुरुदेव दत्तात्रय स्मरावा । उंडि घालिति दिगंबर ॥४१॥
गोरक्षणार्थ सामर्थ्य पाहिले । श्रीदत्तावरि चक्र सोडिले ।
कटि हृदय कंठावरि टाकिले । तीन वेळे मोकलिले चक्र ॥४२॥
धुरांतुनि शस्त्र घातले । ते धुरास काय लागले ।
शरीर अविनासि कोवळे । परी न तुटे चक्राला ॥४३॥
विस्मयो केला नाथाने । मग राहिला लपोन ।
बोरबनि अळि होऊन । त्यासि काढिति दत्तात्रय ॥४४॥
मग आपण म्हणति नाथासि ! मि लपतां तु काढिसि ।
हांजी म्हणता स्वामिसि । सर्वांचे जाले हृदयस्छ ॥४५॥
ब्रह्म जैसा सापडेना । दत्त तैसा रे कळेना ।
बाचेसि फार वेळे घ्याना । तरि येके स्मरणे वेधवि ॥४६॥
दत्तासि शरण जे गेले । ते मुक्ति भरवसि लाधले ।
वैकुंठ वासि केले । बिष्णुसमान अनुभव ॥४७॥
दत्तभक्त नाहि परतला । झडत पडत वैकुंठ नेला ।
जन्मे येकाच मुक्त केला । जेवि काशी विश्वनाथे ॥४८॥
काशीच्या पंचक्रोशात । मुक्ति विश्वनाथ देत ।
दत्त समर्थ मूर्तिमंत । शत सहस्त्र गावे का असेना ॥४९॥

राजा प्रजा हीनासि । भाविक किंकर दिनासि ।
विश्वास धरूनि नामापासि । आवडि रूप चिंतावे ॥५०॥
आला रे आलारे म्हणति । आनंद जाल्या वोळखति ।
सेखि स्वामिहि दीसति । आपुलल्या विश्वासे ॥५१॥
विश्वासे तुम्हि येक । पाहाल जरि कौतुक ।
दत्ताचे होऊनि रंक । वेव्हारिहि का असेना ॥५२॥
राजा प्रजाही नासी । भाविक किंकर दिनासि ।
विश्वास धरूनि नामापासि । आवडि रूप चिंतावे ॥५३॥
चिंतिलिया आवडि कारणे । दत्तात्रय स्मरण येणे ।
सख्या माझ्या कायवणे । मागेल ते देतुसे ॥५४॥
आवडि सकळो आले । दत्त समर्थ स्वामि पावले ।
माझे मनोरथ पुरविले । भोग मोक्षादिक ॥५५॥
त्यास लागेना का गोडि । भये तन्हि स्मरण वोढि ।
नक्र गजेंद्राचे तोडि । भांडण जन्मांतरिचे ॥५६॥
सुखे विमाना रूढ केले । सद्या मुक्ति पावले ।
तिहि त्रासुनि आळविले । यास्तव घ्यावे गोविंदु ॥५७॥
गोविंदा लवकरी यावे । नाहि तरि सर्व त्यागावे ।
धावत धावत जेवि जावे । तेवि धरावे परमार्थी ॥५८॥
यदुराज परम भक्त । दत्तात्रयाचि भेटि घेत ।
त्यास चौविसा गुरुचि ख्यात । सांगुन तो उद्धरिला ॥५९॥
शंकराचार्यासि । दशनामि या वर देऊन ।
तो पंथाभिमान धरून । मुक्तता दे तयाला ॥६०॥
पुराणि किति काय आहे ख्याति । धन्य धन्य सुरवर देव म्हणति ।
नांव घेता पापे जळोनि जाति । होति महंत सिद्ध हे ॥६१॥
दत्तात्रया स्वामिराया । मि जाणे जं आपुलि काया ।
हे आहे तुझी छाया । अैसा ध्यास राहावा ॥६२॥
अद्यापि काय पाहातांत । काहो दुरी धरीतांत ।
मज कां उपेक्षितांत । नाहि दर्शन कां दासां ॥६३॥

अरे हे आवडि आहे । तरि हे घे धावत लवलाहे ।
डोळा स्थिर करूनि पाहे । भ्रम मध्ये नांदति ॥६४॥
त्यासि यावया उसिरू । हा आपला अविचारू ।
आता येईल सारंग धरू । कमळ नयन कोवसा ॥६५॥
भक्तिहिना करवेना । मुद्राहीना समजेना ।
योगाभ्यास उमजेना । अज्ञान लळिवाड तुझी ॥६६॥
अवघा देव अंतरिचा । सख्या कृष्ण गोकुळिचा ।
क्षीरसागरि नारायणाचा । अवतार तो तुझा ॥६७॥
चित्ता दत्तनाम चिंतावे । तरि दत्तमय मन व्हावे ।
देह दत्तात्रयेच करावे । तेव्हा घडे स्मरण हो ॥६८॥
पृथ्वी आप तेज वायु आकाश । अंतः करणादि पंचकोश ।
प्राण पंचकादि विशेष । स्वामिच माझा ॥६९॥
शब्द स्पर्श रस रूप गंध । या विषयासि आपला छंद ।
याचा चालक दत्त गोविंद । सत्तासूत्र त्या पासि ॥७०॥
येवढिया सत्ता ना येकापासि । जरि भावे भजो लागसि ।
त्याचि ये चमत्कारासि । काय वाणू अवधुता स ॥७१
अवधूता धावे सत्त्वरी । माध्यान्हि भिक्षा कोल्हापुरी ।
भोजन करी पंचाळेश्वरी । निद्रास्थानक माहोर ॥७२॥
मागुति प्रातः स्नानासि । अगत्य जावे वाणारसि ।
तेथुनि महालक्ष्मीपासि । माध्यान्हि भिक्षा पंचलाडु ॥७३॥
दत्त अवतार त्रिमूर्तिचा । महालक्ष्मी अंश विष्णुचा ।
या लागि समारंभ भिक्षेचा । लाभ वाटे महालक्ष्मीस ॥७४॥
पाचसे पन्नास वोवी । हे दत्त चरणास अर्पावि ।
फुले घेऊनि ठेवावी । नरहरी स्वामिच्या मस्तकी ॥७५॥
इति श्री पुष्पांजुळि ग्रंथ पंचमोध्याय ॥ संपूर्णमस्तु ॥